रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष


रायगड सोमवार । दि. २० जुलै २०२६ । अंक ४४ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## पुढील दोन दिवस मुसळधार!

**मुंबई :** पुढील दोन दिवस राज्यातील अनेक भागांत मुसळधार पावसाची शक्यता असल्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. विशेषतः कोकण, गोवा आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकण-गोवा विभागात काही ठिकाणी मुसळधार पाऊस, तर घाट परिसरात विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना आणि ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तसेच उत्तर मध्य महाराष्ट्रातील घाट भागातही विजांसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

## पावसाचा दूत कर्नाळा अभयारण्यात

**खांदा कॉलनी :** मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या कर्नाळा पक्षी अभयारण्यात पावसाळ्याची चाहूल देणारा रंगीबेरंगी ओडीके पक्षी (Black-backed Dwarf Kingfisher) पक्षी पुन्हा एकदा दाखल झाला असून, पक्षीप्रेमी आणि छायाचित्रकारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. लालसर चोच, जांभळट डोके, निळसर पंख आणि केशरी रंगाच्या छटांनी नटलेला हा लहान आकाराचा पक्षी आपल्या •➤ पान २ वर



## वेधक

### भीषण अपघातात एक जागीच ठार

**महाड :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर शनिवार, १८ जुलै रोजी रात्री ९ ते ९.३० च्या दरम्यान मोटारसायकलचा भीषण अपघात घडला. या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून, दुसरा गंभीररित्या जखमी झाला आहे. महामार्गावर राजेवाडी हद्दीतील ब्रिजवर मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या लेनवर हा अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच संकेत मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी जखमींना तात्काळ महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, दुर्दैवाने डॉक्टरांनी चेतन शिवाजी शिंदे, मूळ रा. छत्री निजामपूर, सध्या रा. बिरवाडी याला मृत घोषित केले. या अपघातातील जखमी निलेश विष्णू लाड, रा. हावरे, ता. पोलादपूर याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला पुढील उपचारांसाठी माणगाव येथे हलवण्यात आले आहे.

### कर्जतमधून दोन अल्पवयीन मुली बेपत्ता

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील नेवाळी आदिवासीवाडीतून १५ आणि १६ वर्षीय दोन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून, त्यांना फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. १७ जुलै रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास फिर्यादींची १६ वर्षांची मुलगी आणि पुतणीची १५ वर्षीय मुलगी घरातील कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेल्या. दोघीही अद्याप घरी परतल्या नसल्याने कुटुंबियांनी पोलिसांकडे धाव घेतली. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. महिला पोलीस उपनिरीक्षक मीनल शिंदे अधिक तपास करीत आहेत.

### पतीच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**पेण :** पतीकडून सातत्याने होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळून एका विवाहितेने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना पेण तालुक्यातील राजमाची येथे घडली आहे. १४ जुलै रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास विवाहित महिला घरी असताना विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. फिर्यादीनुसार, लग्नानंतर काही दिवस व्यवस्थित वागणूक दिल्यानंतर आरोपी पतीने तिला सतत मानसिक त्रास देणे, मारहाण करणे सुरू केले होते. या सततच्या छळामुळे विवाहितेने टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आला आहे.

## रायगडात पावसाचा लपंडाव, शेतकरी संकटात

# भातलागवड 2 टक्केच

### अतिवृष्टीमुळे २ हजार हेक्टरवरील रोपवाटिकांचे नुकसान

**। रायगड । प्रतिनिधी ।**

भातशेतीसाठी अपेक्षित असणारा मान्सूनचा पाऊस उशिरा दाखल झाला. त्यानंतर पुन्हा गायब झाला. यामुळे खरीप हंगामातील भातशेती संकटात सापडली आहे. आधी लांबलेल्या पावसामुळे, तर नंतर अतिवृष्टीमुळे भातशेती अडचणीत सापडली आहे. जुलै महिना निम्म्याहून अधिक सरला असला तरी भाताचे कोठार अशी ओळख असलेल्या रायगड जिल्ह्यात एकूण लागवड क्षेत्राच्या केवळ १.६७ टक्के क्षेत्रावर भातलागवड करण्यात आली आहे. पावसाने दडी मारल्याने भातलागवड संथगतीने सुरू आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी भाताची रोपे पावसामुळे करपल्याने शेतकऱ्यावर दुष्काळाचे संकट ओढवण्याची चिन्हे दिसत आहेत.

रायगड जिल्ह्यात जवळपास ९० हजार हेक्टर भात लागवडीखालील क्षेत्र आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून या लागवड क्षेत्रात सातत्याने घट होत चालली आहे. यास वाढते शहरीकरण आणि औद्योगिकरण कारणीभूत ठरले आहे. यंदा त्यात निसर्गाच्या लहरीपणाची भर पडण्याची चिन्हे दिसत आहेत. गेल्या वर्षी जवळपास ७१ हजार हेक्टरवर भातलागवड करण्यात आली होती. यावर्षी तेवढ्या क्षेत्रावरही भातलागवड होईल की नाही याबाबत साशंकता आहे.

निसर्गाचा लहरीपणा यास कारणीभूत ठरला आहे. जून महिन्याचे पहिले तीन आठवडे



जिल्ह्यात पाऊस पडला नाही. जून महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात पावसाला सुरूवात झाली, त्यामुळे शेतीच्या कामांना गती मिळाली होती. पण, जुलै महिन्याच्या पहिल्या आठ दिवसांत जिल्ह्यात सर्वत्र अतिवृष्टी झाली. ठिकठिकाणी पूरस्थिती उद्भवली, त्यामुळे जवळपास २ हजार १०० हेक्टरवरील भाताच्या रोपवाटिका नष्ट झाल्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जिल्हा परिषदेच्या •➤ पान २ वर

**उरणमध्ये २४.४६ टक्के**

जिल्ह्यातील ९१ हजार ५२०.७२ हेक्टर सरासरी भात क्षेत्रापैकी केवळ १ हजार ५२७.४९ हेक्टर (१.६७ टक्के) क्षेत्रावर लागवड पूर्ण झाली आहे. उरण तालुक्यात सर्वाधिक २४.४६ टक्के क्षेत्रावर लागवड झाली आहे. त्याखालोखाल सुधागडमध्ये ६.५९ टक्के आणि तळा तालुक्यात ५.९४ टक्के लागवड झाली आहे. तर अलिबाग, पोलादपूर, मुरूड, कर्जत, पनवेल आणि महाड या तालुक्यांमध्ये लागवडीचे प्रमाण अत्यल्प आहे. ही एक चिंताजनक बाब आहे.




● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

## पर्यटकांना खुणावतोय!

**■ दुधाळ धबधब्यांच्या सरींनी खुलले सह्याद्रीचे सौंदर्य**

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

पावसाने दमदार हजेरी लावताच मुरूड तालुक्यातील डोंगरदऱ्या नवचैतन्याने बहरल्या असून, वावडुंगी ग्रामपंचायत हद्दीतील सुमारे २०० फूट खोल सवतकडा धबधबा पुन्हा एकदा फेसाळत्या जलधारांसह प्रवाहित झाला आहे. दाट हिरवाई, धुक्याची चादर आणि खळाळत कोसळणाऱ्या दुधाळ धबधब्यांचे विहंगम दृश्य अनुभवण्यासाठी पर्यटकांची पावले आता या निसर्गरम्य स्थळाकडे वळू लागली आहेत.

सायगाव गावापासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या या धबधब्याकडे जाणारा मार्ग घनदाट वृक्षराजी आणि डोंगररांगांमधून जातो. या पायवाटेवरून चालताना उजव्या बाजूला डोंगरातून कोसळणाऱ्या दुधाळ धबधब्यांची अखंड रांग नजरेत भरते. प्रत्येक धबधबा वेगळे सौंदर्य उलगडत पर्यटकांना थांबून निसर्गाचा आनंद घेण्यास भाग पाडतो.

धबधब्याच्या •➤ पान २ वर

## जातवैधता प्रमाणपत्रासाठी धावपळ

### रायगडात तब्बल १,०२३ प्रकरणे प्रलंबित

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

बारावीचा निकाल लागल्यानंतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला वेग आला असताना रायगड जिल्ह्यात जात वैधता प्रमाणपत्रासाठी तब्बल १,०२३ प्रकरणे प्रलंबित असल्याचे समोर आले आहे. यामध्ये ८७३ शैक्षणिक प्रकरणांचा समावेश असून, वेळेत कागदपत्रांची पूर्तता न झाल्याने अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत अडचणींचा सामना करावा लागत आहे. विद्यार्थ्यांसह सेवांतर्गत आणि निवडणुकीशी संबंधित अर्जदारांचीही प्रतीक्षा कायम असल्याने जात पडताळणी समितीच्या कार्यालयात अर्जदारांची मोठी गर्दी होत आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शासनाने सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) अनिवार्य केली आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशावेळी अडचणी येऊ नयेत म्हणून जात पडताळणी समितीकडून अकरावी विज्ञान शाखेपासूनच अर्ज स्वीकारले जातात. यासाठी शिबिरे, जनजागृती मोहीम आणि विशेष उपक्रमही राबविले जातात. मात्र, अनेक विद्यार्थी बारावीचा निकाल लागल्यानंतरच अर्ज दाखल करीत असल्याने ऐन प्रवेश प्रक्रियेत अर्जांचा मोठा ओघ वाढतो आणि पडताळणीवर ताण निर्माण होतो.

पाक्षिक अहवालानुसार, प्रलंबित १,०२३ प्रकरणांपैकी ७२५ प्रकरणे •➤ पान २ वर

**ऑनलाईन जातवैधता प्रमाणपत्रामुळे दिलासा**

जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया अधिक सुलभ केली आहे. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्र थेट ऑनलाईन आणि ई-मेलद्वारे उपलब्ध करून दिले जात आहे. त्यामुळे प्रमाणपत्रासाठी कार्यालयाच्या फेऱ्या मारण्याची गरज कमी झाली असून, अर्जदारांचा वेळ आणि खर्चही वाचत आहे. कार्यालयाने यासाठी स्वतंत्र डिजिटल यंत्रणा कार्यान्वित केली असून, कागदपत्रांची पूर्तता वेळेत झाल्यास प्रमाणपत्र लवकर मिळू शकते, असे समितीने स्पष्ट केले आहे.

## डॉक्टरांचा बंद तात्पुरता स्थगित

**मुंबई :** डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयातील डॉक्टरांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ सोमवारपासून राज्यभर पुकारण्यात आलेला खासगी डॉक्टरांचा २४ तासांचा बंद इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए)ने तात्पुरता स्थगित केला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणातील मुख्य आरोपी रमेश म्हात्रे यांचा जामीन रद्द करून त्यांना पोलिसांसमोर शरण येण्याचे आदेश दिल्यानंतर न्यायालयाच्या आवाहनाचा मान राखत आयएमएने बंद मागे घेतल्याचे जाहीर केले. त्यामुळे सोमवारी राज्यभर खासगी रुग्णसेवा पूर्ववत सुरू राहणार आहे. मात्र, डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी कठोर कायदा लागू करावा, वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या संरक्षणाबाबत अध्यादेश काढावा, अशी आयएमएची मागणी आहे.

## भरकटलेल्या १३ ट्रेकर्सची सुटका

### इर्शाळगड-प्रबळगडदरम्यानचा थरार

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

इर्शाळगडावरून माची प्रबळगडाच्या दिशेने ट्रेकसाठी निघालेल्या ठाण्यातील टीसीएस कंपनीत कार्यरत १३ तरुणांचा गट दाट जंगलात भरकटल्याने एकच खळबळ उडाली. अंधार, निसरडे कातळ, खोल दऱ्या आणि मोबाईल नेटवर्क नसल्याने ट्रेकर्स गंभीर संकटात सापडले होते. मात्र, आपत्कालीन ११२ क्रमांकावर मदतीचा कॉल मिळताच पनवेल तालुका पोलिसांसह स्थानिक वाटाडे, निसर्ग मित्र संस्था आणि हेल्प फाऊंडेशनने संयुक्त बचाव मोहीम राबवत सर्व १३ ट्रेकर्सची सुखरूप सुटका केली.



पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट मार्शल-४वरील नितीन सोनवणे व प्रदीप पोपटे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्या मदतीला माची प्रबळ गावातील अनुभवी वाटाडे नवनाथ पारधी, हरिश्चंद्र पारधी व नथुराम पारधी यांच्यासह पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे तीन अधिकारी व सात पोलीस कर्मचारी सहभागी झाले. तसेच निसर्ग मित्र संस्थेचे सचिन शिंदे, वरद पवार, हेमंत वैद्य, अक्षय देशमुख आणि हेल्प फाऊंडेशनच्या रेस्क्यूअर्सनीही बचाव मोहिमेत मोलाची भूमिका बजावली.

रात्र वाढत असताना दाट जंगलातून मार्ग काढणे हे बचाव पथकापुढील मोठे आव्हान होते. अनेक ठिकाणी एका चुकीच्या पावलाने शेकडो फूट खोल दरीत कोसळण्याचा •➤ पान २ वर



● (छायाचित्र : महेश पवार)

## बाळसईत एकाच रात्री मंदिरासह नऊ घरे फोडली

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाळसई गावात अज्ञात चोरट्यांनी एकाच रात्री ग्रामदेवता बेलजाई मातेचे मंदिर आणि नऊ बंद घरांना लक्ष्य करत धाडसी घरफोडी केली. या घटनेत मंदिरातील देवीच्या अंगावरील सुमारे दोन ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी-मंगळसूत्र व नथ, तसेच दानपेटीतील सुमारे आठ ते दहा हजार रुपयांची रोकड लंपास करण्यात आली. याशिवाय मंदिरातील सीसीटीव्ही यंत्रणाही चोरट्यांनी पळवून नेल्याने तपासासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी आधी रेकी करून बंद घरे हेरली असावीत, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. चोरी करताना काही घरांच्या शेजारील घरांना बाहेरून कडी लावण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे चोरीदरम्यान •➤ पान २ वर

## वीरेश्वर मंदिरात धाडसी चोरी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली शहरातील ऐतिहासिक आणि पेशवेकालीन वीरेश्वर मंदिरात अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास धाडसी चोरी करत शिवलिंगावरील तब्बल ११ किलोहून अधिक वजनाची चांदीची पिंड लंपास केली. मंदिराच्या मागील दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केलेल्या चोरट्यांनी चोरीनंतर मंदिराच्या संरक्षण भिंतीवरून उडी मारून पलायन केले. हा संपूर्ण प्रकार मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, या घटनेमुळे खोपोली शहरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास मंदिरातील नित्यपूजा आणि साफसफाईसाठी पुजारी व नियमित भाविक मंदिरात आले असता मागील प्रवेशद्वारासह गाभाऱ्याच्या दरवाजाचे कुलूप तुटलेले आढळले. संशय आल्याने गाभाऱ्याची पाहणी करण्यात आली असता शिवलिंगावरील चांदीच्या पिंडीचा कळस आणि पिंडीखालील चांदीचे आच्छादन चोरीस गेल्याचे उघडकीस आले. त्यानंतर मंदिराचे विश्वस्त आणि खोपोली पोलिसांना तातडीने याची माहिती देण्यात आली.

घटनेची माहिती मिळताच खोपोली पोलीस, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा (एलसीबी) आणि न्यायवैद्यक •➤ पान २ वर




● (छायाचित्र : संतोषी म्हात्रे)

**■ ११ किलोची चांदीची पिंड लंपास**

**■ सीसीटीव्हीत चोरटे कैद, शहरात खळबळ**

## अवघ्या दोन वर्षांतच घरांना गळती



**■ पुनर्वसित इर्शाळवाडीत दरडग्रस्तांची व्यथा**

**■ राज्य शासनाकडे दुरुस्तीसाठी याचना**

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी दरड दुर्घटनेला रविवारी (दि. १९) तीन वर्षे पूर्ण होत असताना पुनर्वसित आदिवासी बांधवांच्या आयुष्यातील संकटांची मालिका अद्याप संपलेली नाही. दरडीत आप्तस्वकीय, घरे आणि संसार गमावलेल्या कुटुंबांसाठी शासनाने नानीवली येथे उभारून दिलेली घरे अवघ्या दोन वर्षांतच गळू लागल्याने पुनर्वसित कुटुंबांवर पुन्हा एकदा संकट ओढवले आहे. त्यामुळे घरांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे याचना करण्याची वेळ या कुटुंबांवर आली आहे.

१९ जुलै २०२३ रोजी मध्यरात्री इर्शालवाडीवर कोसळलेल्या भीषण दरडीने संपूर्ण वाडी उद्ध्वस्त केली होती. या दुर्घटनेत ८४ आदिवासी बांधवांचा मृत्यू झाला, तर अनेकजण बेपत्ता •➤ पान २ वर

**शेततळ्यांचा होणार उत्पादक वापर** | **आत्मा योजनेंतर्गत रायगडात ८६१ मत्स्यशेती प्रात्यक्षिके**

## मत्स्यपालनातून शेतकऱ्यांना बळ

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पारंपरिक शेतीवर वाढते हवामान संकट आणि उत्पादन खर्चाचा वाढता बोजा लक्षात घेऊन शेतकऱ्यांना अतिरिक्त व शाश्वत उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यात तब्बल ८६१ मत्स्यपालन प्रात्यक्षिके राबविण्यात येणार असून, शेततळ्यांमध्ये मत्स्यशेती विकसित करून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्याला रोहू, कटला आणि मृगळ या जातींचे एक हजार मत्स्यबीज तसेच ६० किलो मत्स्यखाद्य उपलब्ध करून दिले



जाणार आहे. याशिवाय मत्स्यबीज संगोपन, खाद्य व्यवस्थापन, पाण्याची गुणवत्ता, रोग नियंत्रण आणि आधुनिक मत्स्यपालन तंत्रज्ञानाबाबत तज्ज्ञांकडून प्रशिक्षण व मार्गदर्शनही दिले जाणार आहे.

मत्स्यबीज व मत्स्यखाद्याचा पुरवठा पुणे येथील मल्हार फिश इंटरप्रायझेस आणि वीर फिश सीड हॅचरी यांच्या माध्यमातून केला जाणार आहे. या उपक्रमामुळे वर्षभर शेततळ्यांचा प्रभावी वापर होऊन शेतकऱ्यांना शेतीबरोबरच पूरक उत्पन्नाचा स्थिर स्रोत उपलब्ध होणार आहे.

रायगडमध्ये या योजनेसाठी ८६१ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात ३०० शेततळ्यांमध्ये मत्स्यपालन सुरू करण्यात येणार आहे. उरण, त्याखालोखाल •➤ पान २ वर

**तालुकानिहाय शेततळी**

| | |
|---|---|
| ● उरण | ३०० |
| ● कर्जत | १०० |
| ● मुरूड | २५ |
| ● अलिबाग | ४२ |
| ● खालापूर | ४० |
| ● पनवेल | ५० |
| ● माणगाव | ५० |
| ● पोलादपूर | १० |
| ● श्रीवर्धन | ०१ |
| ● महाड | २८ |
| ● सुधागड | ५० |
| ● तळा | १५ |
| ● रोहा | १०० |
| ● पेण | ५० |

## अंदाज चुकला, कोटींचे नुकसान

### गव्हाण फाटा-पनवेल मार्गावर ट्रेलरची उड्डाणपुलाला धडक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

गव्हाण फाटा पनवेल मार्गावरील पाडेघर परिसरात शनिवारी उंचीचा चुकीचा अंदाज घेतल्याने ट्रेलरचा उड्डाणपुलाच्या लोखंडी संरचनेला जोरदार धक्का बसून मोठा अपघात झाला. या दुर्घटनेत ट्रेलरवर वाहतूक करण्यात येत असलेले परदेशातून आयात केलेले दोन अत्याधुनिक विद्युत ट्रक गंभीररित्या नुकसानग्रस्त झाले. या अपघातात सुमारे दोन कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, उड्डाणपुलाचा कोणताही भाग कोसळलेला नसून, अपघात केवळ ट्रेलरवरील वाहनांची उंची आणि



मार्गावरील ४.८ मीटर उंचीच्या मर्यादेचा योग्य अंदाज न घेतल्याने घडला. बांधकामस्थळी उंचीची मर्यादा दर्शविणारे फलक स्पष्टपणे लावण्यात आले होते. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून चालकाने ट्रेलर पुढे नेल्याने हा प्रकार घडला.

अपघातग्रस्त ट्रेलरवर सानी कंपनीचे परदेशातून आयात करण्यात आलेले निळ्या रंगाचे दोन विद्युत ट्रक लादण्यात आले होते. उड्डाणपुलाच्या लोखंडी संरचनेला पहिल्या ट्रकचा वरचा भाग जोरदार आदळल्याने त्याची चालक केबिन पूर्णपणे उखडून मागे सरकली आणि मागील ट्रकवर आदळली. या धडकेत दोन्ही महागड्या वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

सुदैवाने, ट्रक मजबूत साखळदंडांनी ट्रेलरला सुरक्षितपणे बांधलेले असल्याने ते रस्त्यावर कोसळले नाहीत. अन्यथा या मार्गावर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता •➤ पान २ वर

# लेखी आश्वासन फक्त कागदावरच

## वैष्णो लॉजिस्टिकविरोधात शेतकरी-भूमीपुत्र आक्रमक; पुन्हा गेटबंद आंदोलनाचा इशारा

। उरण । प्रतिनिधी ।

तालुक्यातील जासई येथील वैष्णो लॉजिस्टिक सीएफएस प्रशासनाने स्थानिक शेतकरी, भूमीपुत्र आणि कामगारांना दिलेले लेखी आश्वासन पाळले नसल्याचा गंभीर आरोप करत आंदोलनकर्त्यांनी कंपनीविरोधात पुन्हा आक्रमक भूमिका घेतली आहे. रोजगार, कंत्राटे आणि स्थानिकांना प्राधान्य देण्याबाबत ३० दिवसांत निर्णय घेण्याचे लेखी आश्वासन देऊनही मुदत उलटून गेल्यानंतरही कोणतीही अंमलबजावणी न झाल्याने शेतकरी व कामगारांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

या आंदोलनाचे नेतृत्व सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे करीत असून, कंपनीने तातडीने आश्वासनांची पूर्तता न केल्यास पुन्हा तीव्र गेटबंद आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.



माहितीनुसार, ११ जून २०२६ रोजी कंपनीचे जनरल मॅनेजर मनोज नायर यांच्या उपस्थितीत शेतकरी प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि पोलिस प्रशासन यांच्यात बैठक झाली होती. या बैठकीत कंपनीने एका महिन्याच्या आत दोन स्थानिकांना कायमस्वरूपी रोजगार, दोन नवीन कंत्राटे देणे तसेच उर्वरित मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी कंपनीच्या संचालकांसोबत बैठक आयोजित करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. या आश्वासनावर विश्वास ठेवून स्थानिक शेतकरी आणि भूमीपुत्रांनी सुरू असलेले गेटबंद आंदोलन स्थगित केले होते.

मात्र, महिनाभराचा कालावधी संपूनही कंपनीने दिलेल्या आश्वासनांपैकी एकाही मागणीची पूर्तता केली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. रोजगाराचे आश्वासन अद्याप कागदावरच असून कंत्राटांचा प्रश्नही प्रलंबित आहे. संचालक स्तरावरील बैठकही झालेली नसल्याने कंपनीच्या भूमिकेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे यांनी कंपनी प्रशासनावर टीका करत सांगितले की, ''लेखी आश्वासन देऊन स्थानिकांची दिशाभूल करण्यात आली आहे. रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या भूमिपुत्रांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. कंपनीने तात्काळ दिलेली आश्वासने पूर्ण करावीत, अन्यथा पुन्हा गेटबंद आंदोलन उभारले जाईल.'' तसेच, कंपनीने लेखी करार आणि आश्वासनांचे पालन न केल्यास संबंधित शासकीय यंत्रणांनी या प्रकरणाची चौकशी करून आवश्यक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, कंपनीने आश्वासनांची अंमलबजावणी केली नाही तर तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल. भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास संपूर्णपणे कंपनी प्रशासनच जबाबदार राहील, असा कडक इशारा अजित म्हात्रे यांनी दिला आहे. त्यामुळे वैष्णो लॉजिस्टिक आणि स्थानिक शेतकरी-भूमीपुत्र यांच्यातील वाद पुन्हा चिघळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

# कोकण परिक्षेत्रात रायगड पोलिसांचा दबदबा

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

२१ व्या कोकण परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळावा२०२६ मध्ये रायगड पोलीस दलाने दमदार कामगिरी करत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. विविध स्पर्धात्मक विषयांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत रायगड पोलिसांनी ९ सुवर्ण, ६ रजत आणि ७ कांस्य अशी एकूण २२ पदके मिळवत पदकतालिकेत अव्वल स्थान मिळविले.

या मेळाव्यात रायगड पोलीस दलातील अधिकारी आणि अंमलदारांनी सहा विविध स्पर्धात्मक विषयांमध्ये सहभाग घेत आपल्या ज्ञान, कौशल्य आणि व्यावसायिक क्षमतेचा ठसा उमटविला. उत्कृष्ट संघभावना, शिस्त, कर्तव्यनिष्ठा आणि सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर रायगड पोलिसांनी हे यश संपादन केले.



● (छायाचित्र : धम्मशील सावंत)

**■ २२ पदकांची कमाई करत सर्वसाधारण विजेतेपदावर मोहोर**

या उल्लेखनीय कामगिरीमुळे रायगड पोलीस दलाच्या कार्यक्षमतेची आणि व्यावसायिक तयारीची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. या यशाबद्दल पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्व अधिकारी व अंमलदारांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# कर्नाळा अभयारण्य पर्यटकांनी फुलले

## पक्ष्यांचा किलबिलाट अनुभवण्यासाठी मोठी गर्दी

। पनवेल । प्रतिनिधी ।

पावसाळ्याला सुरुवात होताच मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या कर्नाळा पक्षी अभयारण्यात पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. शनिवार-रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रायगड आणि पुणे येथून हजारो पर्यटक निसर्गाचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी येथे दाखल होत आहेत.

पावसामुळे हिरवाईने नटलेला परिसर, दाट धुक्याची चादर, पक्ष्यांचा मधुर किलबिलाट आणि कर्नाळा किल्ल्याकडे जाणारा निसर्गरम्य ट्रेकिंग मार्ग पर्यटकांना विशेष आकर्षित करत आहे. त्यामुळे सकाळपासूनच अभयारण्याच्या प्रवेशद्वारावर पर्यटकांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.





● (छायाचित्र : राजेश डांगळे)

पनवेलपासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर असलेले कर्नाळा पक्षी अभयारण्य विविध दुर्मिळ पक्षीप्रजातींसाठी प्रसिद्ध असून, पावसाळ्यात येथे ट्रेकिंग, पक्षीनिरीक्षण, छायाचित्रण आणि निसर्गभ्रमंतीसाठी मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देत आहेत. दरम्यान, वन विभागाने पर्यटकांना अभयारण्यातील स्वच्छता राखण्याचे, प्लास्टिकचा वापर टाळण्याचे, कचरा न टाकण्याचे तसेच मोठ्या आवाजात संगीत न वाजवता वन्यजीव आणि पक्ष्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

## क्षुल्लक कारणावरुन काठीने मारहाण

। मुरूड । प्रतिनिधी ।

केसांचा पुंजका अंगणात पडल्याच्या किरकोळ कारणावरून शेजाऱ्यांनी महिलेला शिवीगाळ करून काठीने मारहाण केल्याची घटना मुरूड तालुक्यातील राटोकेखार येथे घडली. १८ जुलै रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास फिर्यादी महिला घरासमोर केस विंचरत असताना केसांचा पुंजका शेजाऱ्यांच्या अंगणात पडला. यावरून शेजारी राहणाऱ्या आरोपी व त्याच्या पत्नी तसेच मेहुणीने वाद घालत महिलेला शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपीने हातातील काठीने महिलेच्या पाठीवर व डाव्या हाताच्या मनगटावर मारहाण करून दुखापत केली. याप्रकरणी मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# चिडीपाडा येथे मोरीला भगदाड

## बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणावर संताप व्यक्त

। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।

अलिबाग-रेवस मार्गावरील चिडीपाडा येथे मोरी खचून रस्त्यावर मोठे भगदाड पडल्याने वाहनचालकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वीच खानाव-उसर येथे अशाच प्रकारच्या भगदाडामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. तरीही सार्वजनिक बांधकाम खात्याने कोणताही धडा न घेतल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, चिडीपाडा येथील मोरी धोकादायक झाल्याबाबत अनेकदा तक्रारी करूनही संबंधित विभागाने त्याकडे दुर्लक्ष केले. अखेर पावसामुळे मोरीचा भाग खचल्याने रस्त्यावर मोठे भगदाड पडले आहे.



अलिबाग-रेवस हा जिल्ह्यातील महत्त्वाचा आणि वर्दळीचा मार्ग असल्याने दररोज हजारो नागरिक, विद्यार्थी आणि पर्यटक या मार्गाचा वापर करतात. त्यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी या ठिकाणी मोठी दुर्घटना होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खानाव-उसर दुर्घटनेनंतर जिल्ह्यातील धोकादायक मोऱ्या आणि पुलांची तपासणी होणे अपेक्षित होते. मात्र, तसे झाले नसल्याने नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## तरुणावर हल्ला

। तळा । प्रतिनिधी ।

दहा वर्षांपूर्वी झालेल्या पैशांच्या व्यवहाराचा राग मनात धरून एका व्यक्तीने तरुणावर लाकडी काठीने हल्ला केल्याची घटना तळा तालुक्यातील बारपे येथे घडली. या हल्ल्यात जखमीच्या डाव्या पायाला फ्रॅक्चर झाले असून, उजव्या पायालाही दुखापत झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ जुलै रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास फिर्यादी धनगरवाडीत बकऱ्या आणण्यासाठी गेले होते. तेथून बारपे गावाकडे परतत असताना आरोपीने चांदवडीच्या झाडाची काठी घेऊन त्यांच्या डाव्या पायाच्या गुडघ्याखाली जोरदार वार केला. तसेच मारहाणीत त्यांना गंभीर दुखापत झाली. याप्रकरणी तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरून

## सवतकडा धबधबा पर्यटकांना खुणावतोय!

दिशेने वाटचाल करताना अंगावर उडणारे थंडगार पाण्याचे तुषार आणि डोंगरातून वाहणाऱ्या वाऱ्याची आल्हाददायक झुळूक मनाला प्रसन्न करून जाते. धबधब्याचा खळाळता आवाज, हिरव्या गर्द वनराईचे सान्निध्य आणि पावसाळी वातावरण यामुळे येथे येणाऱ्या प्रत्येकाला निसर्गाच्या कुशीत हरवून गेल्याचा अनुभव येतो. अनेक पर्यटक धबधब्याखाली चिंब भिजण्याचा आनंद लुटत आहेत, तर काही जण या नयनरम्य दृश्यांची छायाचित्रे आणि सेल्फी आपल्या कॅमेऱ्यात टिपताना दिसून येतात.

सवतकड्याच्या खोल दरीत पसरलेले दाट धुके हे येथील आणखी एक वैशिष्ट्य आहे. दरीत डोकावल्यावर धुक्याच्या पडद्यामुळे काहीच दिसत नाही. मात्र, काही क्षणांनी हेच धुके वर सरकू लागते आणि क्षणार्धात संपूर्ण परिसर स्वर्गीय रूप धारण करतो. हा निसर्गाचा चमत्कार अनुभवताना पर्यटक अक्षरशः भारावून जातात.

कोकणाला लाभलेल्या निसर्गसंपदेचे हे एक अद्वितीय रूप मानले जाते. पावसाळ्यात हिरवागार शालू परिधान केलेले डोंगर, नागमोडी वळणांचे रस्ते, डोंगरकपारीतून कोसळणारे निर्झर आणि धुक्याने वेढलेला परिसर यामुळे मुरूड तालुक्याचे सौंदर्य अधिकच खुलून दिसते. त्यामुळे सवतकडा धबधब्यासह गारंबी धरण, आंबोली धरण आणि परिसरातील इतर पर्यटनस्थळांवरही पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे.

पर्यटनाचा आनंद घेताना पर्यटकांनी सुरक्षिततेचे नियम पाळावेत, खोल पाण्यात उतरणे टाळावे, मद्यपान करून धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे आणि परिसर स्वच्छ ठेवून निसर्गाचे जतन करावे, असे आवाहन स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## पावसाचा दूत कर्नाळा अभयारण्यात

आकर्षक सौंदर्यामुळे सहज लक्ष वेधून घेतो. पावसाळा सुरू होताच हा पक्षी कर्नाळा परिसरातील दाट जंगलात घरटी बांधण्यासाठी आणि प्रजननासाठी येत असल्याचे पक्षी अभ्यासक सांगतात.

स्थानिकांमध्ये या पक्ष्याला ''पावसाचा दूत'' म्हणूनही ओळखले जाते. ओडीकेचे दर्शन म्हणजे पावसाळ्याची चाहूल, अशी पारंपरिक समज अनेक वर्षांपासून प्रचलित आहे.कर्नाळा अभयारण्यातील ओलसर वातावरण, दाट झाडी आणि नैसर्गिक अधिवास या पक्ष्याच्या वास्तव्यास पोषक ठरतात. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात देश-विदेशातील पक्षीनिरीक्षक आणि वन्यजीव छायाचित्रकार येथे मोठ्या संख्येने भेट देतात.

पक्षी अभ्यासक माधव आठवले यांनी सांगितले की, ''ओडीके हा अत्यंत लाजाळू आणि दुर्मिळ दिसणारा पक्षी आहे. त्याची उपस्थिती म्हणजे जंगलातील पर्यावरण संतुलित असल्याचे द्योतक आहे. त्याच्या अधिवासाचे संरक्षण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.''

वन विभागाने पर्यटकांना पक्षीनिरीक्षण करताना शांतता राखावी, घरट्यांजवळ गर्दी करू नये आणि जंगलातील नियमांचे पालन करावे, असे आवाहन केले आहे.

पावसाळ्यात कर्नाळा अभयारण्यात ओडक पक्ष्याच्या आगमनामुळे निसर्गप्रेमींना आणखी एक सुंदर पर्वणी लाभली असून, या रंगीबेरंगी पाहुण्यामुळे कर्नाळ्याच्या जैवविविधतेत पुन्हा एकदा भर पडली आहे.

## भरकटलेल्या १३ ट्रेकर्सची सुटका

धोका असतानाही बचाव पथकाने शोधमोहीम सुरू ठेवली. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतर भरकटलेल्या ट्रेकर्सपर्यंत पोहोचून त्यांना सुरक्षित मार्गाने एकामागोमाग एक खाली आणण्यात यश आले.

सुटका करण्यात आलेल्या ट्रेकर्समध्ये आदित्य अशोक विचारे, प्रकाश संतोष सावंत, यतीन कालिया, ऋतुराज सदाशिव पाटील, अंकित मिश्रा, दीपक उत्तम बनकर, अभिषेक जयप्रकाश बहादूरकर, दीपक कुमार राजदेव महतो, अनिकेत दुबे, चेतन शिंदे, राहुल बनकर, प्रशांत पांचोरे आणि रोहित कुमार यांचा समावेश आहे. हे सर्वजण ठाणे येथील टीसीएस कंपनीत कार्यरत असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

वेळीच मिळालेल्या मदतीमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली. जीवाची पर्वा न करता राबविण्यात आलेल्या या धाडसी संयुक्त बचाव मोहिमेबद्दल पनवेल तालुका पोलीस, स्थानिक वाटाडे, निसर्ग मित्र संस्था आणि हेल्प फाउंडेशनच्या रेस्क्यूअर्सवर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## अवघ्या दोन वर्षांतच घरांना गळती

झाले. गुरेढोरे, संसारोपयोगी वस्तू, आयुष्यभराची बचत आणि कुटुंबातील अनेक सदस्य एका क्षणात काळाच्या पडद्याआड गेले. या जखमा आजही ताज्याच असून, अनेक कुटुंबे आपल्या बेपत्ता नातेवाईकांच्या आठवणीत इर्शाळगडाकडे आशेने पाहत असल्याचे हृदयद्रावक चित्र आहे.

दरड दुर्घटनेनंतर शासनाने नानीवली येथे आपत्तीग्रस्तांसाठी ४४ पक्की घरे उभारून त्यांचे पुनर्वसन केले. सुरक्षित निवारा मिळाल्याने नव्याने संसार उभा करण्याचा प्रयत्न सुरू झाला. मात्र, अवघ्या दोन वर्षांतच या घरांच्या छतांना गळती लागल्याने पावसाळ्यात रहिवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. घरांच्या छतांमधून पाणी झिरपत असल्याने घरातील साहित्याचे नुकसान होत असून लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना ओलसर वातावरणात राहावे लागत आहे. नैसर्गिक आपत्तीमधून कसाबसा बचावलेल्या या आदिवासी कुटुंबांना आता घरांच्या गळतीच्या नव्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याने त्यांच्यात तीव्र नाराजी आहे.

पुनर्वसित ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, शासनाने दिलेल्या घरांमुळे सुरक्षित आयुष्याची अपेक्षा होती; मात्र अल्पावधीतच घरांची गुणवत्ता प्रश्नचिन्हाखाली आली आहे. संबंधित विभागाने तातडीने पाहणी करून गळतीची दुरुस्ती करावी आणि दोषी ठेकेदारांची चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरड दुर्घटनेच्या तिसऱ्या स्मृतिदिनी इर्शाळवाडीतील जखमा पुन्हा एकदा उफाळून आल्या आहेत. एका बाजूला आप्तस्वकीय गमावल्याचे दुःख आजही कायम आहे, तर दुसऱ्या बाजूला शासनाने उभारून दिलेल्या घरांची झालेली दुरवस्था पुनर्वसित कुटुंबांच्या वेदनेत आणखी भर घालत आहे. त्यामुळे केवळ पुनर्वसन करून जबाबदारी संपत नाही, तर त्या घरांची गुणवत्ता आणि देखभालही तितकीच महत्त्वाची असल्याचे या घटनेतून अधोरेखित होत आहे.

## अंदाज चुकला, कोटींचे नुकसान

नाकारता आली नसती. अपघातानंतर गव्हाण फाटापनवेल तसेच जेएनपीटीकडे जाणाऱ्या मार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यानंतर क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त ट्रेलर बाजूला हलविण्यात आला आणि वाहतूक हळूहळू पूर्ववत करण्यात आली.

प्राथमिक तपासात चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याचे समोर आले असून, संबंधित चालकाविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## वीरेश्वर मंदिरात धाडसी चोरी

(फॉरेन्सिक) पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मंदिर परिसराची पाहणी करून पुरावे गोळा केले तसेच सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले. प्राथमिक तपासात दोन अज्ञात चोरटे चांदीची पिंड घेऊन मंदिराच्या संरक्षण भिंतीवरून उडी मारत पसार होताना स्पष्टपणे दिसत असल्याची माहिती समोर आली आहे. या दृश्यांच्या आधारे संशयितांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

वीरेश्वर मंदिर हे खोपोली व खालापूर तालुक्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असून, त्याला ऐतिहासिक महत्त्वही आहे. शहराच्या मध्यवर्ती आणि दाट लोकवस्तीच्या परिसरात असलेल्या या मंदिरात चोरीची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संताप व्यक्त होत आहे. लक्ष्मीनगर, वरची खोपोली यांसारख्या वस्तीच्या भागालगत असलेल्या मंदिरात चोरट्यांनी इतक्या नियोजनबद्ध पद्धतीने चोरी केल्याने शहरातील सुरक्षेच्या व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

चोरीस गेलेल्या चांदीच्या पिंडीची किंमत मोठी असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून, आरोपींना तातडीने अटक करून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे. पोलिसांनी परिसरातील इतर सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू केली असून, विविध पथके आरोपींच्या शोधासाठी रवाना करण्यात आली आहेत.

## बाळसईत एकाच रात्री मंदिरासह नऊ घरे फोडली

कोणी बाहेर पडू नये किंवा प्रकाराची माहिती होऊ नये, यासाठी हा डाव आखण्यात आल्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे.

मंदिरातील चोरीप्रकरणी बेलजाई माता देवस्थानचे अध्यक्ष मधुकर ठमके यांनी नागोठणे पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. बाळसई गावात यापूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणावर घरफोडीची घटना घडली नसल्याने ग्रामस्थांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे.

चोरी झालेल्या घरांमध्ये मुंबईत वास्तव्यास असलेले निवृत्त पोलिस अधिकारी भिकाजी पवार यांच्यासह भिकाजी जाधव, शरद जाधव, स्वप्निल पाटेकर यांच्या बंद घरांचा समावेश आहे. तसेच वाकण-आमडोशी-रोहा मार्गालगत असलेल्या शांताराम खांडेकर, दौलत कोकाटे आणि नारायण फराडे यांच्या घरांनाही चोरट्यांनी लक्ष्य केले. याशिवाय मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या अनंत ठमके आणि कृष्णा मुंडे यांच्या घरांतही घरफोडी करण्यात आली. घरमालकांपैकी बहुतांश जण कामानिमित्त मुंबई व ठाणे येथे वास्तव्यास असल्याने त्यांच्या घरातून नेमका किती ऐवज चोरीला गेला, याची माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे चोरीचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. घटनेची माहिती रविवारी पहाटे सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास बाळसईचे पोलीस पाटील पंकज कोकाटे यांना मिळाली. त्यांनी तात्काळ नागोठणे पोलिस ठाण्याशी संपर्क साधत माहिती दिल्यानंतर प्रभारी पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. त्यानंतर फिंगरप्रिंट तज्ज्ञ आणि श्वान पथकालाही पाचारण करण्यात आले. दोन्ही पथकांनी मंदिरासह सर्व घरफोडी झालेल्या ठिकाणांची तपासणी करून महत्त्वाचे पुरावे संकलित केले. मंदिरातील सीसीटीव्ही यंत्रणा चोरट्यांनीच लंपास केल्याने त्यांची ओळख पटविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले आहे. याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, रेकी करून नियोजनबद्ध पद्धतीने चोरी करणाऱ्या टोळीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली आहेत.

## भात लागवड २ टक्केच

सेस फंडातून ७५ टक्के अनुदानातून बियाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे. १४ जुलैपर्यंत जिल्ह्यातील ९१ हजार ५२०.७२ हेक्टर सरासरी भात क्षेत्रापैकी केवळ १ हजार ५२७.४९ हेक्टर (१.६७ टक्के) क्षेत्रावर लागवड पूर्ण झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत २.१३ टक्के क्षेत्रावर लागवड झाली होती. त्यामुळे यंदा भातलागवड गेल्या वर्षाच्या तुलनेतही मागे असल्याचे कृषी विभागाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. तालुकानिहाय आकडेवारी पाहता उरण तालुक्यात सर्वाधिक २४.४६ टक्के क्षेत्रावर लागवड झाली आहे. त्याखालोखाल सुधागडमध्ये ६.५९ टक्के आणि तळा तालुक्यात ५.९४ टक्के लागवड झाली आहे. तर अलिबाग, पोलादपूर, मुरूड, कर्जत, पनवेल आणि महाड या तालुक्यांमध्ये लागवडीचे प्रमाण अत्यल्प आहे. ही एक चिंताजनक बाब आहे.

जिल्ह्यात १० जुलैपर्यंत झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक शेतांमध्ये पाणी साचले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना लागवड करता आलेली नसून, पाणी ओसरल्यानंतरच पुनर्लागवडीला वेग येणार आहे. कृषी विभागाच्या मते, पुढील काही दिवस हवामान अनुकूल राहिल्यास जिल्ह्यातील भातलागवडीचा वेग वाढण्याची अपेक्षा आहे. पण, पावसाचा अनियमितपणा असाच सुरू राहिला, तर मात्र यंदा भात लागवडीखालील क्षेत्रात गेल्या वर्षीच्या तुलनेत घट होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास शेतकरी संकटात सापडणार आहे.

## मत्स्यपालनातून शेतकऱ्यांना बळ

उरण, रोहा या तीन तालुक्यांमध्ये शंभर ते तीनशे तळे उभारली जाणार आहेत.खालापूर,अलिबाग, पेण, पनवेल, सुधागड, माणगाव या तालुक्यांमध्ये ४० ते ५० आणि महाड, मूरूड या तालुक्यात २५ ते २८ तळे उभारली जाणार आहेत

यासाठी १,७२२ मत्स्यबीज हंड्यांचा पुरवठा केला जाणार आहे.

कृषी विभागाच्या मते, एकात्मिक शेती पद्धतीला चालना देत ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यास ही योजना महत्त्वाची ठरणार आहे.

## जातवैधता प्रमाणपत्रासाठी धावपळ

एक महिन्याच्या कार्यवाहीतील, १८१ प्रकरणे ४५ दिवसांच्या आत, तर ११७ प्रकरणे ४५ दिवसांहून अधिक कालावधीपासून प्रलंबित आहेत. यामध्ये ८७३ शैक्षणिक, १२० सेवांतर्गत आणि ३० निवडणूक विषयक प्रकरणांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, सर्वाधिक प्रकरणे शैक्षणिक असल्याने विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या कार्यालयात अर्ज दाखल करणे, त्रुटींची पूर्तता आणि सुनावणी यासाठी दररोज मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर केल्यास प्रकरणांचा निपटारा अधिक जलद होऊ शकतो, असे आवाहन समितीकडून करण्यात आले आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. जामरूंग, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) श्री. दिपक भाऊ मोगारे व २) श्री. स्वप्निल दिपक मोगारे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| २० | ३ | एकुण क्षेत्र ०-६७-० हे. आर. पॉ. यापैकी विकत घेत असलेले क्षेत्र ००-५८-०० हे. आर. पॉ. | ०-४७ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २०/०७/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
ऑफीस-रा. बी - ३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरल-पश्चिम,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ९२६०२०९०९६

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली निवासी सदनिका असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) प्राजक्ता प्रसाद कविटकर २) प्रसाद रामचंद्र कविटकर दोघेही रा. रूम नं. ४०४,बि विंग, रामेश्वर कृपा धाम, फडके रोड, डोंबिवली (पूर्व) यांच्याकडून कायम विकत घेण्याचा व्यवहार ठरविलेला असून सदर निवासी सदनिका ही मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग येथील अलिबाग नगरपरिषद अलिबाग हद्दीतील तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील सिटी सर्व्हे नं. १०५१, १०५१ के या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेली 'निर्माण हाईटस गृहनिर्माण सोसायटी मर्या. अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड' या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रमांक ३०३ क्षेत्र ३३३ चौ फुट बिल्टअप अटॅच ओपन टेरेस क्षेत्र १३६ चौ. फुट, त्याचा अलिबाग नगर परिषद मालमत्ता क्र. ALB000002230 जुना नं., Z2RNL002247 मॅन्युअल नं. 1883 विंग सदनिका क्र.303 ही निवासी सदनिका या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर निवासी सदनिका मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसल्या कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत आणून द्यावीत. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही. तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख १६/०७/२०२६

सही/-
**ॲड.शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता-दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालयासमोर, ता. अलिबाग जि. रायगड.

## निवडक



### विद्यार्थ्यांना मिळाला लावणीचा आनंद

**महाड :** भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतीला अधिक प्राधान्य आहे. हेच धडे प्राथमिक शाळेपासूनही विद्यार्थ्यांना दिले जातात, त्याचप्रमाणे निसर्गाची किमया व शेतकऱ्यांची मेहनत याची सांगड घालून लहानपणापासूनच विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्याकरता, रायगड जिल्हा परिषद शाळा घुरुपकोंड येथे विद्यार्थ्यांसाठी शेत शिवार अंतर्गत भात लावणी हा उपक्रम दि.१६ जुलै रोजी घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिगवण, मुख्याध्यापिका स्मिता नवघरे, उपक्रमशिल शिक्षक ज्ञानोबा गायकवाड, विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. घुरुपकोंड शाळेमध्ये नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात. त्यातीलच परिसराशी निगडित असलेला हा अतिशय महत्त्वाचा उपक्रम शाळेमध्ये राबवल्यामुळे ग्रामस्थांना व पालकांना अतिशय आनंद झाला. या उपक्रमाला सर्वांकडून शुभेच्छा मिळाल्या. विद्यार्थ्यांनीही भविष्यात "आम्ही आनंदाने शेती करू", असे वचन दिले आणि भात लावणीचा आनंद घेतला. शेतमालक अनिता शिगवण यांनी सक्रिय सहभाग घेतला व विद्यार्थ्यांचे आभार मानले. शिक्षक व विद्यार्थी यांनी नांगर हाकण्याचा देखील अनुभव घेतला.



### वांगचुक यांच्या समर्थनार्थ निदर्शने

**पनवेल :** दिल्लीतील राष्ट्रीय वैद्यकीय प्रवेश परीक्षा (नीट) प्रश्नपत्रिका फुटी, परीक्षा प्रक्रियेतील गैरव्यवहार आणि शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात उपोषण करणारे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ, तसेच सरकारच्या कथित दडपशाहीविरोधात संविधानप्रेमी नागरिकांच्यावतीने खांदा कॉलनीतील संविधान कट्टायेथे शांततापूर्ण निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात स्थानिक नागरिक, युवक, विद्यार्थी, पालक तसेच विविध सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यावेळी उपस्थितांनी सांगितले की, सोनम वांगचुक हे गेल्या वीस दिवसांपासून राष्ट्रीय वैद्यकीय प्रवेश परीक्षा (नीट) प्रश्नपत्रिका फुटी, राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकतेचा अभाव आणि शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात दिल्लीतील जंतर-मंतर येथे उपोषण करत आहेत. दि.१८ जुलै रोजी पोलिसांनी त्यांना जंतर-मंतरवरून हटवून रुग्णालयात दाखल केल्याच्या घटनेचा निषेधही आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला. या आंदोलनात सर्वहारा जनआंदोलनाच्या उल्का महाजन यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्ष यांच्या कार्यपद्धतीवर टीका करताना, "भूक, भीती, भ्रम, भेद, भिक आणि भ्रष्टाचाराच्या माध्यमातून देशातील लोकशाही धोक्यात आणली जात आहे," असा आरोप केला. सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा, परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता व सुधारणा, तसेच शांततापूर्ण लोकशाही आंदोलनाच्या अधिकाराचे संरक्षण या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.



### तालुका सचिवपदी संदेश कातळकर

**श्रीवर्धन :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते संदेश कातळकर यांची श्रीवर्धन तालुका सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीमुळे श्रीवर्धन तालुक्यात मनसेच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. पक्षाच्या संघटन विस्तारासाठी तसेच तालुक्यात मनसेची भूमिका अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी संदेश कातळकर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. पक्षाने त्यांच्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी मनसे अध्यक्ष राज साहेब ठाकरे तसेच पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले. यावेळी त्यांनी श्रीवर्धन तालुक्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी, युवकांना पक्षाशी जोडण्यासाठी आणि जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# 'हायड्रोजन'चा जुनाच फंडा रुळावर

## पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देश

| नेरळ | संतोष पेरणे |

ब्रिटीशकालीन वारसा लाभलेली आणि पर्यटकांच्या आकर्षणाचे प्रमुख केंद्र असलेली नेरळ-माथेरान हेरिटेज मिनीट्रेन आता नव्या तंत्रज्ञानाच्या दिशेने वाटचाल करत आहे. पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने भारतीय रेल्वेने राबविलेल्या "हायड्रोजन फॉर हेरिटेज" या महत्त्वाकांक्षी योजनेत माथेरान हिल रेल्वेचा विचार आहे. त्यामुळे रेल्वेकडून हायड्रोजन रेल्वे हा प्रयोग राबविल्यावर मोठा गाजावाजा केला जात आहे. मात्र, ब्रिटिश काळात नेरळ-माथेरान मिनीट्रेन वाफेच्या इंजिनवरच चालायची. त्यामुळे मिनी ट्रेन चालविण्यात यशस्वी ठरलेला जुनाच फंडा हायड्रोजन रेल्वे म्हणून बाजारात आणला आहे.



सह्याद्रीच्या निसर्गरम्य कुशीत नागमोडी वळणे घेत धावणारी नेरळ-माथेरान ही मिनिट्रेन देशातील ऐतिहासिक हेरिटेज रेल्वेमार्गीपैकी एक मानली जाते. दरवर्षी हजारो देशी-विदेशी पर्यटक या रेल्वेच्या प्रवासाचा आनंद घेत असतात. आता आधुनिक, प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने या रेल्वेचे आकर्षण आणखी वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भारतीय रेल्वेने २०२३-२४ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात "हायड्रोजन फॉर हेरिटेज" योजनेची घोषणा केली होती. या योजनेअंतर्गत ऐतिहासिक रेल्वेमार्गावर हायड्रोजनवर चालणारी इंजिने सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याच योजनेत माथेरान हिल रेल्वेचा समावेश करण्यात आल्याने या प्रकल्पाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. मात्र, ब्रिटीश काळात १८५३ मध्ये भारतात रेल्वे सुरू झाली त्यावेळी रेल्वे वाफेवर चालणाऱ्या इंजिनवरच चालवली जात होती. १९०७ मध्ये मध्य रेल्वेवरील नेरळ येथून माथेरानसाठी मिनीट्रेन सुरू झाली. १९८४ पर्यंत ही मिनीट्रेन वाफेपासून तयार होणाऱ्या ऊर्जेवर चालायची. त्यानंतर रेल्वेने जर्मन बनावटीची वाफेवरील इंजिने एक-एक करून हेरिटेज म्हणून आपल्या म्युझियममध्ये ठेवून घेतली. त्यातील एक इंजिन नवी दिल्ली येथील रेल भवन बाहेर, दुसरे इंजिन मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे, तिसरे इंजिन नेरळ जंक्शन येथे आणि चौथे इंजिन माथेरान रेल्वे स्थानकात शोभेचे बाहुले बनून उभी आहेत.

नुकतेच प्रधानमंत्री यांनी हिरवा झेंडा दाखवून सुरू केलेल्या हायड्रोजन रेल्वेच्या इंजिनमध्ये निर्माण होणारी ऊर्जा देखील कोळशापासूनच तयार होणार आहे. तसेच, गाडी पुढे जात असताना इंजिनमधून पाणी बाहेर पडणार आहे. ब्रिटिश काळात देखील वाफेवरील इंजिन अशाच प्रकारे कोळशावर चालवली जात होती. त्यामुळे हायड्रोजन इंजिनमध्ये नेमके वेगळे काय? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडत आहे.

### ध्वनीप्रदूषणात मोठी घट

सध्या नेरळ ते माथेरान दरम्यानच्या मिनिट्रेन इंजिनसाठी डिझेल या इंधनाचा वापर होतो. भविष्यात हायड्रोजन इंजिनाचा वापर सुरू झाल्यास धूर, कार्बन उत्सर्जन आणि ध्वनीप्रदूषणात मोठी घट होईल. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होण्याबरोबरच पर्यटकांना अधिक स्वच्छ, शांत आणि सुखद प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

## 'टीम चित्रलेखा पाटील फॉर एन्व्हायरमेंट'

# महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपणाचा शुभारंभ

| अलिबाग | प्रतिनिधी |

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, टीम चित्रलेखा पाटील फॉर एन्व्हायरमेंट आणि लायन्स क्लब ऑफ श्रीबाग यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.१९) पीएनपी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते वृक्ष लागवडीच्या उपक्रमाचा शुभारंभ झाला.

हा उपक्रम अलीकडच्या काळात वाढते प्रदूषण, पर्यावरणाची होत असलेली हानी, ऑक्सिजनची कमतरता हे सर्व टाळण्यासाठी वृक्ष लागवड काळाची गरज असल्यामुळे राबवण्यात आला. या उपक्रमाला



पीएनपी महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, पीएनपी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पाटील, गबाजी गीते, प्रा. निशिकांत कोळसे, प्रा. दिनेश पाटील, प्रा. गणेश पाटील, प्रा. मिलिंद घाडगे, लायन्स क्लब श्रीबागचे अध्यक्ष नितीन पाटील, निहा राऊत, विजय वनगे, के.डी. पाटील, कला पाटील, निहा घरत, तानाजी भोसले, विद्याधर पैठणकर, विजय पोळ, तन्वी पाटील, सई पाटील, प्रशाली पाटील, विघ्नेश पाटील, हर्ष पाटील हे सहभागी झाले होते. या उपक्रमाचे आयोजन आणि नियोजन "टीम चित्रलेखा पाटील फॉर एन्व्हायरमेंट" या संस्थेकडून करण्यात आले होते. तसेच, या वृक्षारोपण उपक्रमासाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे आभार लायन्स क्लबचे उपाध्यक्ष श्रीकांत पाटील यांनी मानले.

# जयंत पाटील यांच्याकडून म्हात्रे कुटुंबाचे सांत्वन

| अलिबाग | प्रतिनिधी |

नारंगी गावातील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ व निष्ठावान कार्यकर्ते नरहरी म्हात्रे यांचे १२ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनानंतर रविवारी (दि. १९) शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी नारंगी येथे जाऊन म्हात्रे कुटुंबियांची भेट घेत सांत्वन केले. यावेळी जयंत पाटील यांनी नरहरी म्हात्रे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. तसेच दुःखाच्या प्रसंगी कुटुंबियांना धीर देत पक्ष त्यांच्या पाठीशी कायम उभा राहील, अशी भावना व्यक्त केली. यावेळी अनिल गोमा पाटील, अमोल पाटील, अनिल धुमाळ, वाघमोडे, आपणकर, निखिल म्हात्रे, दीपक म्हात्रे तसेच नारंगी गावातील ग्रामस्थ, शेकापचे कार्यकर्ते आणि म्हात्रे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# साहित्य वारी निघाली पंढरीला

| उरण | प्रतिनिधी |

रायगडमधील साहित्यिकांची आषाढीला "साहित्य वारी" निघते हा रायगडाचा अभिमान आहे, असे मत ॲड. गोपाळ शेळके यांनी व्यक्त केले. उरण तालुक्यातील नवघर येथून कोकण मराठी साहित्य परिषद साहित्यिकांची शनिवारी (दि.१८) पंढरपुरला आषाढी वारी निघाली. त्यावेळी ते बोलत होते.

यंदा कोमसापची ही १६वी वारी आहे. ही वारी कोमसाप विश्वस्त साहित्यरत्न प्रा. एल.बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निघते. दरम्यान, मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे यांनी श्रीफळ वाढवून प्रस्थानास सुरुवात केली. यावेळी शाखेचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, बाल विभाग प्रमुख संजीव पाटील, जिल्हा सचिव संजय होळकर, रामसुनील



म्हात्रे, नाटककार किशोर पाटील, कवी नरेश पाटील, महेंद्र गावंड, किशोर म्हात्रे, नाटककार भारत पाटील, संजय पाटील, जान्हवी गंधार, अर्चना विनय, सरिता सुनील आणि उज्ज्वला देविदास या अठ्ठावीस बंधुभगिनींनी विठुरायाच्या गजरात दिंडींची सुरुवात केली. वारीच्या विश्रांतीच्या पाहिल्या टप्प्यात रसायनीतील नढाळ मंदिरात शांताराम देशमुख, गोपाळ शेळके, दत्ताराम शेळके, जयपाल पाटील आणि निखिल देशमुख आदींनी वारकऱ्यांचे स्वागत केले. त्यानंतर रात्री ११.०० वाजता साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन घेण्यात आले. यावेळी मच्छिंद्र म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, किशोर पाटील, नरेश पाटील, संजय होळकर, रमण पंडित, संजय पाटील, किशोर म्हात्रे आणि महेंद्र गावंड यांचे संजीव पाटील यांच्या सूत्रसंचालनात सुरेख कविसंमेलन संपन्न झाले.

# शाळेच्या छपराला प्लास्टिकचा आधार

■ **सत्ताधाऱ्यांच्या विकास दाव्यांवर टीका**

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यात ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेचे तीनतेरा वाजल्याचे विदारक चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. तालुक्यातील जिल्हा परिषद बापवली गावच्या प्राथमिक शाळेला पावसाच्या पाण्याची प्रचंड गळती लागली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वर्गात बसून शिक्षण घेणे मुश्किल झाले होते. अखेर मुलांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी एकत्र येत शाळेच्या छपरावर प्लास्टिक टाकून तात्पुरता आसरा दिला आहे. या प्रकारामुळे मतदारसंघातील सत्ताधारी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाविरोधात नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे बापवली जिल्हा परिषद शाळेच्या छतातून वर्गामध्ये पाणी गळत होते. वर्गखोल्यांमध्ये पाणी साचत असल्याने लहान मुलांना कुठे बसवायचे, असा यक्षप्रश्न शिक्षकांसमोर निर्माण झाला होता. त्यामुळे मुलांचे शिक्षणच धोक्यात आले होते. प्रशासकीय स्तरावर




तातडीने कोणतीही मदत न मिळाल्याने, अखेर बापवली गावातील गावकऱ्यांनी स्वतः पुढाकार घेतला. स्वतः च्या पदरचे पैसे आणि श्रमदान करून ग्रामस्थांनी संपूर्ण शाळेच्या इमारतीवर प्लास्टिकचे आच्छादन टाकले, जेणेकरून मुले आत सुरक्षितपणे शिकू शकतील. गावकऱ्यांच्या या कृतीने प्रशासकीय व्यवस्थेला एक प्रकारे चपराक लगावली आहे.

# १ हजार झाडे लागवडीचा संकल्प

| खांब | प्रतिनिधी |

धाटाव औद्योगिक वसाहतीतील सुदर्शन केमिकल कंपनीच्यावतीने रोहा तालुक्यातील चिंचवली येथे १ हजार झाडे लागवडीचा संकल्प करून तो पुर्णत्वास नेला आहे.सुदर्शन केमिकल कंपनीचे साईट हेड विवेक गर्ग आणि सी.एस.आर. प्रमुख माधुरी सणस यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य सामाजिक उपक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला. चिंचवली येथे गेल्या वर्षीही सुदर्शन कंपनीच्यावतीने मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आले होती. परंतु, दुर्दैवाने लागलेल्या वणव्यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक कोमल वृक्षांची हानी झाली. निसर्गाचे झालेले हे नुकसान पाहून सुदर्शन कंपनीच्या व्यवस्थापनाने हार न मानता, या वर्षी अधिक काळजीपूर्वक १ हजार वृक्षांची रोपे लावण्याचा आणि ते पूर्णपणे जगवण्याचा एक दृढ आणि संवेदनशील मानस व्यक्त केला आहे.

# वाहतूक पोलिसांकडून मानवतेचे दर्शन

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी कर्तव्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत मानवतेचे दर्शन घडविले. मुसळधार पावसात रस्त्यावर बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या एका अनोळखी व्यक्तीला तत्परतेने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करून त्याचा जीव वाचविण्यास मोलाची मदत केली.

पनवेल शहर वाहतूक पोलीस हवालदार अभिमन्यू लाळगे आणि



प्रदीप चव्हाण हे कर्तव्य बजावत असताना, जेएनपीटी ते पनवेलकडे जाणाऱ्या साई वर्ल्ड सिटी मार्गावर एक अनोळखी व्यक्ती मुसळधार पावसात भिजून रस्त्यावर बेशुद्ध अवस्थेत पडल्याची माहिती त्यांना मिळाली. माहिती मिळताच तातडीने घटनास्थळी धाव घेत संबंधित व्यक्तीला सुरक्षितपणे रस्त्याच्या बाजूला हलविले. त्यानंतर तातडीने उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे एका अनोळखी नागरिकाचा जीव वाचविण्यास मोठी मदत झाली.

### चेन खेचून चोरटा पसार

**पनवेल :** विश्वास निघोट हे खांदा कॉलनी सेक्टर ७ येथे राहत असून, एका अनोळखी व्यक्तीने ते रस्त्याने एकटे चालत जात असताना "तुम्ही मला धक्का का दिला?" असे बोलून त्यांची अडवणूक केली. त्यावेळी निघोट यांनी धक्का दिलेला नसतानाही त्या व्यक्तीने त्यांच्यासोबत वाद घातला आणि दमदाटी केली. त्यानंतर निघोटे यांची मान पकडून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरीने खेचून तो पळून गेला.


## मूलभूत सुविधा मिळत नसल्याने संताप | द्रोणागिरीतील दुरवस्थेविरोधात सिडकोला इशारा

# नागरिकांचे मूलभूत हक्क धोक्यात

| उरण | प्रतिनिधी |

द्रोणागिरी नोडमधील नागरिकांना आजही पिण्याचे पाणी, सुरक्षित रस्ते, स्वच्छ गटारे आणि आरोग्याच्या मूलभूत सुविधा मिळत नसल्याने संतापाची लाट उसळली आहे. नागरिकांनी सिडकोच्या मुख्य अभियंत्यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, द्रोणागिरी नोडचा विकास करताना सिडकोने दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात मात्र अनेक वर्षांनंतरही पाणी, रस्ते, गटारे आणि आरोग्य सुविधा या मूलभूत समस्या कायम प्रलंबित आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा एक दिवसाआड होत असून, काही ठिकाणी मात्र मुबलक पाणी दिले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. परिणामी अनेक कुटुंबांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत असून, त्यांचा आर्थिक भार वाढत आहे. तसेच, द्रोणागिरीतील अनेक रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. मोठमोठे खड्डे,



उखडलेले रस्ते आणि पावसामुळे निर्माण झालेली धोकादायक परिस्थिती यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. नोकरदार नागरिकांचा प्रवास खोळंबत असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही त्याचा परिणाम होत आहे. येथील गटारे व नाल्यांची नियमित स्वच्छता न झाल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर येत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, उघड्या गटारांमुळे डासांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया आणि इतर संसर्गजन्य आजारांचा धोका वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

दरम्यान, नागरिकांनी नियमित कर भरूनही मूलभूत सुविधा न मिळणे ही गंभीर बाब असल्याचे नमूद केले आहे. प्रत्येक नागरिकाला सन्मानाने व सुरक्षित वातावरणात जगण्याचा अधिकार आहे. त्यामुळे आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची कायदेशीर जबाबदारी असून, या जबाबदारीत सिडको अपयशी ठरत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच, नियमित पाणीपुरवठा, सर्व रस्त्यांची तातडीने दुरुस्ती, गटारे व नाल्यांची स्वच्छता, बंद गटार व्यवस्था आणि आरोग्यविषयक उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्याची मागणी देखील करण्यात आली आहे.

### संयमाची परीक्षा संपली

"द्रोणागिरीतील नागरिकांच्या संयमाची परीक्षा आता संपली आहे. मूलभूत समस्या तातडीने सोडविण्यात आल्या नाहीत, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन, धरणे आणि उपोषण छेडण्यात येईल. त्यातून निर्माण होणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस सिडको प्रशासनच पूर्णपणे जबाबदार राहील", असा स्पष्ट इशारा द्रोणागिरीतील स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# श्रीवर्धन पोलीस दलावर शोककळा

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धनमधील पोलीस जवान ऋतिक ढोले (२६) यांचा बुधवारी (दि.१५) भीषण कार अपघातात मृत्यू झाला. या धक्कादायक घटनेमुळे श्रीवर्धन परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत असून, पोलीस दलावर शोककळा पसरली आहे.



ऋतिक ढोले हे त्यांच्या चार मित्रांसह कारने कळंब येथून चाहूचीवाडी येथील आपल्या घराच्या दिशेने जात होते. यावेळी गाडी ऋतिक चालवित होते. रात्रीच्या वेळी रस्त्यावरील एका अत्यंत धोकादायक वळणावर अचानक कारवरील नियंत्रण सुटले आणि भरधाव कार रस्त्याच्या कडेला असलेल्या लोखंडी संरक्षक रेलिंगवर जाऊन धडकली. या धडकेत कारच्या पुढील भागाचा पुरता चुराडा झाला. स्थानिक ग्रामस्थ आणि कळंब पोलीसांनी तातडीने धाव घेत जखमींना गाडीबाहेर काढले व भिवपुरी येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच गंभीर दुखापत झाल्यामुळे ऋतिक ढोले यांचा मृत्यू झाला होता. कारमधील इतर चार मित्रही गंभीर जखमी झाले. या दुर्दैवी घटनेमुळे श्रीवर्धनमधील शासकीय वर्तुळात आणि नागरिकांमध्ये मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

# निव्वळ दडपशाही

सोनम वांगचुक यांची उचलबांगडी करून इस्पितळात नेण्याचा प्रकार म्हणजे निव्वळ दडपशाही आहे. खरे तर तिला सरकारी पोषाखातली गुंडगिरी असेही म्हणता येईल. कॉक्रोच जनता पार्टी गेले जवळपास पंचवीस दिवस दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन करते आहे. वांगचुक हेही अठरा दिवस उपोषण करीत होते. या सर्व काळात या आंदोलकांशी चर्चा करावी असे सरकारला एकदाही वाटले नाही. उलट भाजपचे नेते या आंदोलकांवर ते देशद्रोही आहेत अशी टीका करीत राहिले. नीट पेपरफुटीला जबाबदार धरून धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यायला सांगावे अशी आंदोलकांची मागणी आहे. ती सरकारला मंजूर नसणार हे समजण्यासारखे आहे. पण म्हणून आंदोलक हे देशविरोधी ठरत नाहीत. या देशातील लाखो विद्यार्थी आणि त्यांचे पालक विविध परिक्षांमधील पेपरफुटींमध्ये संतप्त आणि संत्रस्त आहेत. कॉक्रोच जनता पार्टीला मिळालेल्या पाठिंब्यावरून त्याची पुरेशी झलक दिसलेली आहे. सरकार या तक्रारीची नीट दखल घेत आहे असे या लोकांना वाटत नाही. दिल्लीतील आंदोलनातून हीच भावना व्यक्त होत होती. दिल्लीच्या आधी देशात इतरत्रही आंदोलने झाली होती. त्यामुळे याला देशव्यापी समर्थन आहे. सरकार याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करते आहे हे पाहूनच वांगचुक यांनी उपोषण सुरू केले व आपला जीव पणाला लावला. त्यांची मागणी व आंदोलन यातील सच्चाईमुळेच अभिनेत्यांपासून ते विविध राजकीय पक्षाच्या लोकांपर्यंत त्यांना पाठिंबा व्यक्त झाला. मोदी सरकारला हेच बहुधा अनपेक्षित होते. वांगचुक किंवा आंदोलकांशी चर्चा करायची नाही हे तर ठरलेले होते. मधल्या काळात वांगचुक यांची प्रकृती बिघडली. कोणीही माणूस इतके दिवस उपोषण करून प्रकृती टिकवू शकत नाही. त्यामुळे मग जगभरातून वांगचुक यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त होऊ लागली. वांगचुक यांनी आपले उपोषण सोडावे असा दबाव त्यांच्यावर येऊ लागला. मात्र ते आपल्या निश्चयावर ठाम होते. त्यातून पेचप्रसंग निर्माण झाला. मग सरकारने नेहमीप्रमाणे न्यायालयाचा वापर करून घेण्याचे ठरवले.

### मोर्चा अयशस्वी होण्यासाठी

त्यानुसार वांगचुक यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त करणारी एक याचिका दिल्ली उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. न्यायालयानेही तिची तात्काळ दखल घेऊन वांगचुक यांच्या प्रकृतीवर डॉक्टरांनी लक्ष ठेवावे असे आदेश दिले. शिवाय सरकारवरही जबाबदारी टाकली. मोदी सरकारने याचाच फायदा घेतला. यापूर्वी शेतकऱ्यांच्या आंदोलनातही आंदोलकांशी थेट चर्चा न करता सरकारचे बाहुले असलेले लोक न्यायालयात गेले. दिल्लीच्या रस्त्यांवर वाहतूक कोंडी होते अशा तक्रारी करण्यात आल्या. मग न्यायालयाने त्यांना हटवण्याचे आदेश दिले. महाराष्ट्रात जरांगे यांच्या मुंबईतल्या उपोषणाच्या वेळीही हाच प्रकार घडला. वास्तविक दक्षिण मुंबईत काहीही त्रास नसताना उच्च न्यायालय अचानक संतप्त झाले व त्यांनी सरकारला वाहतूक कोंडीबाबत धारेवर धरले. मग जरांगे यांना आंदोलनाची परवानगीच नसल्याचा मुद्दा काढण्यात आला. त्यांची कोंडी करून उपोषण संपवण्यास भाग पाडण्यात आले. वांगचुक यांच्या बाबतीत कोर्टाच्या आदेशाचा सोईस्कर अर्थ लावण्यात आला व वांगचुक यांना जबरदस्तीने उचलण्यात आले. त्यासाठी साध्या वेशातले पोलिस पाठवून ते डॉक्टर असल्याचा बहाणा करण्यात आला. वांगचुक यांच्या तपासणीसाठी ते आले आहेत असे सांगण्यात आले. पांढरी कापडे घेऊन व्यासपीठ झाकण्यात आले. सकाळी सात वाजता, जेव्हा खूपच कमी लोक होते त्यावेळी सफाईने हा सर्व कट तडीला नेला गेला. शिवाय आता आंदोलन संपले असून जंतरमंतर खाली करावे अशा उद्घोषणा चालू करण्यात आल्या. मात्र आंदोलकांनी मैदान सोडण्यास नकार दिला. वांगचुक यांची जागा घेऊन अभिजित दीपके यांनी बेमुदत उपोषण सुरु केले. सोमवारी वीस जुलैला संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. पहिल्याच दिवशी जंतरमंतर ते संसद भवन असा मोर्चा काढण्याचे आंदोलक व विरोधी पक्षांनी जाहीर केले आहे. या मोर्चाला यश मिळू नये आणि वांगचुक यांच्या मुद्द्यावरून सरकारला दोष देण्याची संधी विरोधकांना संसदेत मिळू नये यासाठीच सरकारने कारवाईची चपळाई केली हे उघड आहे. पण जनतेच्या मनातील संताप सरकारला टाळता येणार नाही. त्यांच्या प्रश्नांपासून दूर पळता येणार नाही.

### आपसात फूट नको

सोमवारच्या मोर्चाला परवानगी दिलेली नाही असे दिल्ली पोलिसांनी आता जाहीर केले आहे. म्हणजे आणखी एका दडपशाहीची ही तयारी आहे. कदाचित जंतरमंतरवरही अशीच कारवाई एकदोन दिवसात होऊ शकेल. वांगचुक यांना खऱ्या अर्थाने साथ दिली ती डाव्या कम्युनिस्ट पक्षांच्या युवक व विद्यार्थी संघटनांनी. जंतरमंतरवर आंदोलनाचा मोठा भार तर त्यांनी उचललाच. पण त्यांचे नेते वांगचुक यांच्या बरोबरीने उपोषणालाही बसले. वांगचुक यांच्या जोडीने त्यांनाही उचलण्याचा शनिवारी प्रयत्न झाला. पण विद्यार्थ्यांनी तो हाणून पाडला. आता एकदोन दिवसात त्यांनाही जबरदस्तीने येथून बाहेर काढण्याचा प्रयत्न होईल. मोदी एरवी लोकशाहीच्या नावाने टाळ्याखाऊ भाषणे करतात. भारत हीच लोकशाहीची जननी आहे असे खोटे वाक्यही वारंवार फेकतात. पण त्यांचा व्यवहार तद्दन हुकुमशहाचा आहे. विरोधकांशी संवाद करण्याची लाज वाटणारा किंवा स्वतःच्या गुर्मीत राहून विरोधकांना कस्पटासमान लेखणारा नेता लोकशाही देशाचा पंतप्रधान असू शकत नाही. दुर्दैवाने मोदींच्या प्रेमाने पागल झालेल्या भक्त मंडळींना यामध्ये काहीच खटकत नाही. उलट वांगचुक आणि कॉक्रोच यांच्यात खोट काढण्याची संधी ते पाहत आहेत. राहुल गांधी हे वांगचुक यांना पाठिंबा का देत नाहीत असा वाद भाजपनेच सुरु केला व मिडियामधल्या त्याच्या दलालांनी तो उचलून धरला. विरोधकांमध्ये फूट पाडण्याची एकही संधी हे सोडत नाहीत. एरवी भाजपचे विरोधक असलेले काही लोकही वांगचुक हे भाजपच्या इशाऱ्यावरून हे सगळे करीत आहेत असे म्हणत आहेत. चौदा वर्षांपूर्वी अण्णा हजारे व केजरीवाल यांचा वापर भाजपने करून घेतला व आता वांगचुक व दीपके यांना हस्तक म्हणून वापरले जात आहे असे या लोकांचे म्हणणे आहे. वास्तविक जोवर हे दोन्हीही नेते स्पष्ट सरकारविरोधी भूमिका घेऊन उभे आहेत तोवर त्यांच्या भूमिकेविषयी शंका घेणे चुकीचे आहे. तरीही वादासाठी ते समजा खरे मानले तरीही वांगचुक, दीपके यांनी घेतलेला मुद्दा हा महत्वाचा आहे हे तरी सर्वांनाच मान्य करावे लागेल. उद्या समजा वांगचुक यांनी भूमिका बदलली तर त्यांच्यावर टीका करता येईल. दीपके यांचे काही वेगळे रुप दिसले तर तेव्हा पाहता येईल. आज या घडीला मोदी सरकारच्या विरोधातला आवाज उभा राहणे आणि तो संघटित होणे यालाच सर्वोच्च महत्व व प्राधान्य द्यायला हवे. दीपके यांनी समजा उद्या एखाद्या मुद्द्यावर भाजपला सोईची भूमिका घेतली तर त्यावर तेव्हा टीका करता येईल. पण आज तरी ते वागण्याबोलण्यात सातत्य व किमान सच्चाई राखून आहेत. त्यामुळे जे किमान आज तरी भाजपचे नाहीत त्यांना जबरदस्तीने तिकडे ढकलण्याचा प्रयत्न होऊ नये.

## विचार

# मुंबई बुडतेय; जबाबदारी कोणाची?

***मुंबईला देशाची आर्थिक राजधानी म्हणण्याचा अभिमान आपण बाळगतो. हजारो कोटी रुपयांचा अर्थसंकल्प असलेली ही महानगरपालिका. अत्याधुनिक तंत्रज्ञान, 'स्मार्ट सिटी', किनारी रस्ता, मेट्रो, उड्डाणपूल अशा विकासकामांची अखंड यादी; पण या सगळ्या विकासाच्या गदारोळात सर्वसामान्य मुंबईकराला सुरक्षित रस्ता, मजबूत पूल आणि पावसात न तुंबणारे शहर का मिळत नाही, या प्रश्नाचे उत्तर काही मिळत नाही.***



**अजय तिवारी**

मुंबई अलिकडेच पुन्हा एकदा पावसाने नव्हे, तर व्यवस्थेच्या निष्काळजीपणाने बुडाली. प्रत्येक वर्षी पावसाळा सुरू झाला, की एकच चित्र समोर येते- जलमय रस्ते, वाहतूक ठप्प, रेल्वे विस्कळीत, उघडे मॅनहोल, खड्ड्यांमध्ये अडकणारी वाहने आणि मृत्यूच्या दाढेत सापडलेले निष्पाप नागरिक. हे वर्षही त्याला अपवाद नाही. पावसाच्या पाण्यात लपलेल्या मॅनहोलमध्ये पडून गेलेले जीव, निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांमुळे झालेले अपघात, पुलांच्या सुरक्षिततेवर निर्माण झालेले प्रश्न आणि शहरभर पसरलेली तुंबापुरी हे केवळ नैसर्गिक आपत्तीचे परिणाम नाहीत. हे मानवनिर्मित संकट आहे आणि त्यासाठी जबाबदार आहे ती निष्काळजी, बेफिकीर आणि उत्तरदायित्व विसरलेली व्यवस्था. मॅनहोलमध्ये पडून होणारा मृत्यू हा अपघात नाही, तो व्यवस्थेच्या निष्काळजीपणामुळे झालेला मृत्यू आहे. रस्त्यावर साचलेल्या पाण्याखाली उघडे मॅनहोल लपलेले असतील, त्यावर कोणतीही सुरक्षा नसेल, इशारा नसेल आणि त्यात एखादा नागरिक वाहून जाईल, तर त्याला दैवदुर्विलास म्हणणे म्हणजे सत्यापासून पळ काढणे होय. या प्रत्येक मृत्यूची जबाबदारी संबंधित विभाग, काम करणारा ठेकेदार आणि त्यावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांवर निश्चित झाली पाहिजे. कारण नागरिकाने कर भरायचा आणि बदल्यात मृत्यूचा सापळा स्वीकारायचा, ही लोकशाही नाही. सार्वजनिक कामांमध्ये ठेकेदारी पद्धतीचा उद्देश कार्यक्षमता वाढवणे हा होता; परंतु अनेक ठिकाणी ती भ्रष्टाचार आणि निकृष्ट कामांची साखळी बनल्याचा आरोप सातत्याने होत आहे.

निविदा काढल्या जातात, कोट्यवधी रुपयांची कंत्राटे दिली जातात, उद्घाटने होतात; पण पहिल्या पावसात रस्ते उखडतात. मग पुन्हा त्याच रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर होतो. हे विकासाचे दुष्टचक्र आहे, की आर्थिक अपव्ययाचा उद्योग, असा प्रश्न विचारल्याशिवाय राहवत नाही. मुंबईतील रस्ते हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय बनला आहे. वर्षभर खोदकाम, त्यानंतर डांबरीकरण आणि पहिल्याच पावसात खड्डे. पाच वर्षांची हमी असताना एखादा रस्ता सहा महिन्यांमध्ये उखडतो. त्यामुळे गुणवत्ता नियंत्रण कोठे हरवते, रस्त्यांच्या कामासाठी वापरलेले साहित्य निकृष्ट असते का, तांत्रिक मानकांचे उल्लंघन होते की देखरेख करणारी यंत्रणाच निष्क्रिय असते या प्रश्नांची उत्तरे अहवालांमध्ये सापडत नाहीत. ती रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमध्ये दिसतात. पुलांचीदेखील तीच कथा. गेल्या काही वर्षांमध्ये मुंबईत अनेक पुलांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले. तपासण्या, अहवाल, दुरुस्ती आणि पुन्हा नवीन उणिवा. सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या देखभालीकडे केवळ खर्च म्हणून पाहिले जाते. प्रत्यक्षात ती नागरिकांच्या जीविताशी संबंधित गुंतवणूक असते. पुलांचा प्रश्न केवळ अभियांत्रिकीचा नाही, तर प्रशासनाच्या प्राधान्यक्रमाचा आहे.

दरवर्षी मुंबई तुंबते आणि दरवर्षी तेच स्पष्टीकरण दिले जाते, विक्रमी पाऊस, भरती, हवामानबदल वगैरे. हे घटक निश्चितच महत्त्वाचे आहेत; परंतु जगातील अनेक किनारी शहरे त्याहून अधिक पावसाचा सामना करतात आणि तरीही पूर्णपणे ठप्प होत नाहीत. कारण त्यांनी दीर्घकालीन नियोजन केले आहे. मुंबईत मात्र नालेसफाईच्या कामांवर दरवर्षी मोठा खर्च होऊनही पहिल्याच पावसात नाले तुंबतात. याचा अर्थ समस्या निसर्गात नाही, तर ती व्यवस्थापनात आहे. शहराचा नैसर्गिक जलप्रवाह अडवून उभारलेले प्रकल्प, नद्यांवरील अतिक्रमणे, नष्ट होत चाललेली खाडी, काँक्रीटीकरणामुळे कमी झालेली पाणी मुरण्याची क्षमता आणि अपुरी जलनिस्सारण व्यवस्था ही तुंबापुरीची मूळ कारणे आहेत. त्यात हवामानबदलामुळे अतिवृष्टीची भर पडत आहे. त्यामुळे केवळ नालेसफाई करून हा प्रश्न सुटणार नाही. संपूर्ण शहरी नियोजनाचा पुनर्विचार करावा लागेल.

याहून गंभीर बाब म्हणजे उत्तरदायित्वाचा अभाव. दुर्घटना घडते, चौकशी समिती नेमली जाते, काही अधिकाऱ्यांची बदली होते, आर्थिक मदत जाहीर होते आणि काही दिवसांमध्ये प्रकरण विस्मरणात जाते. दोषी ठेकेदार पुढच्या वर्षी पुन्हा कंत्राट मिळवतो. अधिकारी पदावरच राहतो. मंत्री निवेदन करतात; मात्र ज्यांनी आपला माणूस गमावला, त्यांचे आयुष्य कायमचे बदलून जाते. शासनाची संवेदनशीलता केवळ भरपाईच्या चेकपुरती मर्यादित राहिली, तर लोकांचा व्यवस्थेवरील विश्वास ढासळणारच.

या पार्श्वभूमीवर केवळ प्रशासकीय सुधारणा पुरेशा नाहीत. कायद्यात बदल करून निष्काळजीपणामुळे झालेल्या मृत्यूसाठी संबंधित ठेकेदार, अभियंता आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी जबाबदारी निश्चित करावी लागेल. सार्वजनिक कामांसाठी स्वतंत्र गुणवत्ता आयोग स्थापन करायला हवा. सर्व कंत्राटे, गुणवत्ता अहवाल आणि देयके सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध करून पूर्ण पारदर्शकता आणावी. नागरिकांनी नोंदवलेल्या तक्रारींवर निश्चित कालमर्यादेत कारवाई बंधनकारक करावी. तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक मॅनहोल, प्रत्येक पुल आणि प्रत्येक रस्त्याचे डिजिटल निरीक्षण करावे. मुंबईकरांनीही आता केवळ सहनशीलतेचा पुरस्कार थांबवला पाहिजे. कर भरणारा नागरिक हा ग्राहक नाही, तर तो लोकशाहीतील मालक आहे. सुरक्षित सार्वजनिक सुविधा ही त्याची मागणी नसून घटनात्मक अपेक्षा आहे. शासनाला प्रश्न विचारणे, उत्तरदायित्वाची मागणी करणे आणि पारदर्शकतेसाठी दबाव निर्माण करणे ही नागरिकांची सामूहिक जबाबदारी आहे. प्रश्न केवळ पावसाचा नाही, तर प्राधान्यक्रमाचा आहे. विकास म्हणजे फक्त उंच पूल, रुंद रस्ते किंवा भव्य प्रकल्प नव्हेत. विकास म्हणजे पावसात एका आईने आपल्या मुलाला सुरक्षितपणे शाळेत पाठवणे, एका कामगाराने संध्याकाळी सुखरूप घरी परतणे आणि एका वृद्धाने रस्ता ओलांडताना जीवाची भीती न बाळगणे. या मूलभूत अपेक्षा पूर्ण होत नसतील, तर विकासाच्या सर्व दाव्यांपुढे प्रश्नचिन्ह उभे राहते.

मुंबईला नैसर्गिक संकटांपेक्षा मानवनिर्मित संकटांचा अधिक धोका आहे. पाऊस थांबेल, पाणी ओसरेल, वाहतूक पुन्हा सुरू होईल; पण प्रत्येक पावसाळ्यानंतर व्यवस्थेच्या निष्काळजीपणामुळे गेलेले जीव परत येणार नाहीत. त्यामुळे आता घोषणांची नव्हे, तर जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली आहे. कारण जोपर्यंत मृत्यूला जबाबदार असलेल्यांना शिक्षा होत नाही, तोपर्यंत प्रत्येक पावसाळा मुंबईसाठी केवळ ऋतू राहणार नाही, तर व्यवस्थेच्या अपयशाचा वार्षिक स्मृतिदिन ठरत राहील. मुंबईला खऱ्या अर्थाने जागतिक शहर बनवायचे असेल, तर सर्वप्रथम तिच्या नागरिकांचे प्राण सुरक्षित ठेवावे लागतील. अन्यथा, विकासाच्या घोषणा जितक्या उंचावतील, तितकाच जनतेचा शासनावरील विश्वास खोलवर बुडत जाईल. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी. देशाच्या सकल अर्थव्यवस्थेला गती देणारे हे महानगर; पण दुसरीकडे हीच मुंबई दरवर्षी पावसाळ्यात तुंबते, रस्त्यांवर खड्डे पडतात, मॅनहोल मृत्यूचे सापळे ठरतात, पुलांच्या सुरक्षिततेपुढे प्रश्नचिन्ह निर्माण होते आणि सामान्य नागरिकांना स्वतःचा जीव गमावून या सगळ्याची किंमत चुकवावी लागते. विकासाच्या दाव्यांनी गाजणाऱ्या या शहरात प्रत्येक पावसाळ्यानंतर तीच शोकांतिका पुन्हा घडते. सरकार बदलते, सत्ताधारी बदलतात, अर्थसंकल्प वाढतो; पण मुंबईकरांच्या नशिबात मात्र बदल होत नाही. निष्काळजी प्रशासन, निकृष्ट दर्जाची सार्वजनिक कामे आणि दुर्घटनांनंतर दिली जाणारी आश्वासने कायम राहतात.

मुंबईत उघड्या मॅनहोलमध्ये पडून होणारे मृत्यू हे कोणत्याही आधुनिक शहराला न शोभणारे वास्तव आहे. मुसळधार पावसानंतर रस्त्यावर साचलेल्या पाण्याखाली उघडे मॅनहोल दिसत नाहीत आणि क्षणार्धात एखादा निष्पाप नागरिक त्यात वाहून जातो. अशा घटना अपघात म्हणून नोंदवल्या जातात; परंतु प्रत्यक्षात त्या प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे घडलेल्या मानवनिर्मित हत्या आहेत. कारण मॅनहोलवर सुरक्षित झाकणे बसवणे, त्यांची नियमित तपासणी करणे, पावसाळ्यापूर्वी धोकादायक ठिकाणांची पाहणी करणे आणि आवश्यक तेथे सुरक्षा उपाय करणे ही संबंधित यंत्रणांची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडण्यात अपयश आले, तर त्याला केवळ तांत्रिक त्रुटी म्हणता येणार नाही.

## चर्चा आजची

# लालपरी धावत राहावी; पण...




**राकेश लोहार**

महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी लालपरी आजही लाखो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, शेतकरी, मजूर, नोकरदार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि छोट्या व्यावसायिकांसाठी एसटी ही केवळ वाहतुकीची सेवा नाही, तर ती त्यांच्या आयुष्याचा आधार आहे. अशा या लालपरीच्या तिकीट दरात तब्बल १३.५६ टक्क्यांची कायमस्वरूपी वाढ झाल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला मोठी झळ बसली आहे. आधीच वाढत्या महागाईने त्रस्त असलेल्या नागरिकांवर हा आणखी एक आर्थिक बोजा पडला आहे.

एसटी महामंडळाने डिझेलच्या वाढलेल्या किमती, कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता, देखभाल खर्च आणि आर्थिक तुटीचे कारण पुढे करत ही भाडेवाढ केली आहे. महामंडळाच्या दृष्टीने हा निर्णय आर्थिकदृष्ट्या आवश्यक असू शकतो; मात्र सामान्य प्रवाशांच्या दृष्टीने हा निर्णय त्यांच्या रोजच्या जगण्याचा खर्च वाढवणारा आहे. सरकारकडून पुरेशी आर्थिक मदत न मिळाल्याने अखेर त्याचा फटका थेट जनतेलाच बसला आहे.

शहरात नोकरी करणारे कर्मचारी, रोज महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी, बाजारपेठेत माल घेऊन जाणारे शेतकरी, बांधकाम मजूर आणि लहान-मोठे व्यावसायिक यांचा प्रवास खर्च या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. दररोज दोन वेळा एसटीने प्रवास करणाऱ्या व्यक्तीला महिन्याला शेकडो रुपयांचा अतिरिक्त खर्च करावा लागणार आहे. ज्यांचे मासिक उत्पन्न मर्यादित आहे, त्यांच्यासाठी ही वाढ निश्चितच चिंताजनक आहे.

राज्यातील अनेक गावे आजही रेल्वेपासून दूर आहेत. अशा भागांमध्ये एसटी हा एकमेव विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक पर्याय आहे. खासगी वाहतूक सर्वांनाच परवडणारी नसल्याने नागरिकांना एसटीवरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे या भाडेवाढीचा सर्वाधिक फटका ग्रामीण महाराष्ट्राला बसणार आहे. एका कुटुंबातील चार सदस्यांना प्रवास करायचा झाल्यास त्यासाठीचा खर्च आता लक्षणीयरीत्या वाढणार आहे.

उच्च शिक्षणासाठी तालुका किंवा जिल्हा मुख्यालयात जाणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांचा दैनंदिन प्रवास एसटीवर अवलंबून आहे. अनेक विद्यार्थ्यांना सवलती मिळत असल्या, तरी ज्या विद्यार्थ्यांना पूर्ण तिकीट काढावे लागते किंवा वारंवार प्रवास करावा लागतो, त्यांच्यासाठी हा अतिरिक्त खर्च शिक्षणाच्या बजेटवर परिणाम करणारा ठरणार आहे.

गेल्या काही वर्षांत अन्नधान्य, भाजीपाला, दूध, गॅस, पेट्रोल, डिझेल, वीज, औषधे अशा जवळपास सर्वच गरजेच्या वस्तू महागल्या आहेत. आता वाहतूकही महाग झाल्याने सामान्य नागरिकांचे मासिक अर्थकारण आणखी बिघडणार आहे. पगारात वाढ होत नसताना खर्च मात्र सातत्याने वाढत असल्याने मध्यमवर्गीय आणि कष्टकरी वर्ग आर्थिक कोंडीत सापडत आहे.

ग्रामीण भागातील अनेक शेतकरी बाजार समिती, कृषी कार्यालये, बँका किंवा सरकारी कार्यालयांमध्ये जाण्यासाठी एसटीचाच वापर करतात. तसेच छोट्या व्यापाऱ्यांचा माल आणि त्यांचा प्रवास याच माध्यमातून होत असतो. भाडेवाढीमुळे त्यांच्या व्यवसायाच्या खर्चातही वाढ होणार आहे. अप्रत्यक्षपणे या वाढीचा परिणाम वस्तूंच्या किमतींवरही होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एसटी ही केवळ नफा कमावणारी संस्था नाही, तर ती सामाजिक बांधिलकी जपणारी सार्वजनिक सेवा आहे. दुर्गम भागात तोट्यातही बससेवा सुरू ठेवण्याचे काम एसटी करते. त्यामुळे केवळ आर्थिक तूट भरून काढण्यासाठी वारंवार प्रवाशांवर भाडेवाढीचा बोजा टाकणे, हा दीर्घकालीन उपाय ठरू शकत नाही. सरकारने एसटीला अधिक आर्थिक मदत, इंधनावरील करात सवलत, आधुनिक व्यवस्थापन आणि खर्च नियंत्रणाचे उपाय यावर भर देणे आवश्यक आहे.

डिझेलच्या किमती वाढल्या, देखभाल खर्च वाढला, कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढला, हे वास्तव नाकारता येणार नाही. मात्र या सर्वांचा भार फक्त प्रवाशांवर टाकणे कितपत योग्य, हा प्रश्न उपस्थित होत आहे. एसटी ही गरीब आणि मध्यमवर्गीयांची वाहतूक व्यवस्था असल्याने तिचे दर शक्य तितके परवडणारे ठेवणे ही शासनाचीही तितकीच जबाबदारी आहे. राज्य सरकारने एसटी महामंडळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी दीर्घकालीन धोरण आखण्याची गरज आहे.

एसटीचे आर्थिक आरोग्य सुधारले पाहिजे, यात दुमत नाही. मात्र ते करताना सामान्य प्रवाशाचा विचार प्रथम व्हायला हवा. लालपरी ही महाराष्ट्राच्या जनजीवनाची जीवनरेखा आहे. ती सुसाट धावत राहावी, पण त्या प्रवासाचा खर्च सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जाऊ नये, हीच अपेक्षा आहे. अन्यथा महागाईच्या ओझ्याखाली दबलेल्या नागरिकांसाठी प्रत्येक प्रवास हा गरज नसून परवडतो का? असा प्रश्न बनत जाईल. लालपरीची चाके फिरत राहतील; पण त्या चाकांबरोबर सामान्य माणसाच्या खिशालाही रोज नवा फटका बसत राहील. लालपरी सुसाट धावत राहिली पाहिजे, पण त्या वेगाची किंमत सामान्य माणसाच्या खिशाला परवडणारीही असली पाहिजे. अन्यथा लालपरीचा प्रवास सुरू राहील; मात्र सामान्य प्रवाशांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि खिशातील आधार दोन्ही हळूहळू कमी होत जातील.

## लोकसंसद

### राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवर यंदाही मराठी चित्रपटांचा डंका!

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने नुकतीच २०२४ या वर्षासाठीच्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा केली. आदित्य सुहास जांभळे दिग्दर्शित 'आर्टिकल ३७०' या हिंदी चित्रपटाला 'सर्वोत्कृष्ट फीचर चित्रपट' पुरस्कार जाहीर झाला असून कार्तिक आर्यन (चंदू चॅम्पियन, हिंदी) आणि मामूटी (ब्रह्मयुगम, मल्याळम) यांना संयुक्तपणे 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' पुरस्कार घोषित झाला आहे. 'आर्टिकल ३७०' या सिनेमासाठी यामी गौतमला 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्री'चा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. 'अमरन' या तामिळ चित्रपटाचे दिग्दर्शक राजकुमार पेरियासामी यांना 'सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक' म्हणून घोषित करण्यात आले. या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवर दरवर्षी प्रमाणे यंदाही मराठी चित्रपटांनी यशाची मोहोर उमटवली आहे. 'मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी' या दिग्दर्शक परेश मोकाशी यांच्या मराठी चित्रपटाला या पुरस्कारांमध्ये 'सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट' म्हणून राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. तसेच 'घरत गणपती' चित्रपटातील 'नवसाची गौरी माझी' या गाण्यासाठी अभय जोधपूरकर यांना 'सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक' पुरस्कार, अभिजीत अरविंद दळवी यांनी दिग्दर्शित केलेल्या 'हमसफर' या चित्रपटाला 'सर्वोत्कृष्ट लघुपटा'चा पुरस्कार आणि 'स्वरगंधर्व सुधीर फडके' या चित्रपटाच्या उत्कृष्ट पटकथा लेखनासाठी योगेश देशपांडे यांना 'सर्वोत्कृष्ट पटकथा' हा पुरस्कार मिळाला आहे. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेत्या सर्व मराठी कलाकारांचे हार्दिक अभिनंदन! **–प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# जागतिक बुद्धिबळ दिन

'वर्ल्ड चेस ऑर्गनायझेशन' या आंतरराष्ट्रीय संस्थेचा जन्मदिवस २० जुलै हा 'जागतिक बुद्धिबळ दिन' म्हणून साजरा केला जातो. 'वर्ल्ड चेस ऑर्गनायझेशन'च्या जन्माआधी अनेक वर्षांपासून बुद्धिबळ खेळला जात आहे. अभिमानाची गोष्ट म्हणजे बुद्धिबळाचा जन्म भारतातच झाला होता. चतुरंग हे बुद्धिबळाचेच प्राथमिक रूप.

बुद्धिबळ हा दोन खेळाडूंनी एका तक्त्यासारख्या पटाच्या दोन्ही बाजूला बसून खेळावयाचा बैठा खेळ आहे. आज आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळले जाणारे बुद्धिबळ हा पाश्चिमात्य बुद्धिबळ म्हणून ओळखला जातो. बुद्धिबळ सध्या जगातील सर्वांत प्रसिद्ध बैठ्या खेळांपैकी एक आहे. जगभरात अदमासे ६० कोटी हौशी किंवा व्यावसायिक लोक क्लब्जमध्ये, पत्राने, आंतरजालावर व विविध स्पर्धांमधून बुद्धिबळ खेळतात. बुद्धिबळात कला आणि शास्त्र यांचा मिलाफ झालेला दिसतो. स्पर्धात्मक बुद्धिबळाची परंपरा १६ व्या शतकात युरोपमध्ये सुरू झाली. १८८६ साली विल्हेल्म स्टेइनिट्झ हा पहिला अधिकृत बुद्धिबळ विश्वविजेता झाला. विश्वनाथन आनंद हा भारतीय खेळाडू २०१२ सालापर्यंत जगज्जेता होता. बुद्धिबळाच्या सांघिक स्पर्धा 'बुद्धिबळ ऑलिंपियाड' दर दोन वर्षांतून एकदा भरवल्या जातात. दोन आंतरराष्ट्रीय संघटना फेडरेशन इंटरनॅशनाले देस इचेक्स (फिडे) आणि इंटरनॅशनल करस्पाँडन्स चेस फेडरेशन या जगातील महत्वाच्या स्पर्धा भरवतात. बुद्धिबळ खेळणाऱ्या संगणकाच्या निर्मितीसाठी संगणकतज्ज्ञ पहिल्यापासून प्रयत्नशील होते. त्यामुळेच अलीकडील बुद्धिबळावर संगणकाचा प्रभाव पडलेला दिसतो. १९९७ मध्ये गॅरी कास्पारोव्ह (त्यावेळचा जगज्जेता) आणि आय.बी.एम. कंपनीचा डीप ब्ल्यू संगणक यांच्यातील सामन्यातून सर्वांत बुद्धिमान आणि कुशल माणसाला बुद्धिबळात हरवणारी संगणक-प्रणाली तयार करता येते हे सिद्ध झाले. अनेक देश बुद्धिबळाच्या शोधाचा दावा करत असले तरी त्याची सुरुवात प्रथम भारतात झाली असे मानले जाते. बुद्धिबळाचा उगम प्राचीन भारतातील मचतुरंगफ या खेळापासून झाला असे मानले जाते. हा खेळ इराण, युरोपमार्गे पसरत गेला आणि आधुनिक बुद्धिबळाचे स्वरूप धारण केले. बुद्धिबळ हा केवळ एक खेळ नसून, तर्कशक्ती, व सर्जनशीलतेचे प्रतीक आहे. जगभरातील लाखो बुद्धिबळ प्रेमी २० जुलै रोजी आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिन साजरा करतात. हा दिवस बुद्धिबळाचा इतिहास, संस्कृती आणि त्याच्या मानसिक फायद्यांना सन्मान देण्यासाठी समर्पित आहे. अगदी गाव खेड्यापासून शहरापर्यंत या खेळाला महत्त्व आहे. त्यामुळे मैदानी खेळाबरोबरच बुद्धिबळ खेळाच्या स्पर्धा देखील अनेक ठिकाणी आयोजित केल्या जातात. बुद्धिबळ हा केवळ मनोरंजनाचे साधन नसून तो एक उत्कृष्ट शैक्षणिक साधन आहे. हा खेळ खेळणाऱ्या मुलांमध्ये गणितीय क्षमता, तार्किक विचारसरणी आणि निर्णयक्षमता वाढते. अभ्यासांनी दाखवून दिले आहे की नियमित बुद्धिबळ खेळणाऱ्या विद्यार्थ्यांची एकाग्रता, स्मरणशक्ती आणि समस्या सोडवण्याची क्षमता इतर विद्यार्थ्यांपेक्षा वरचढ असते. मानसिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून हा खेळ तणाव कमी करण्यास आणि मानसिक संतुलनास मदत करतो. बुद्धिबळाचे सामाजिक महत्त्वबुद्धिबळ हा एक अशा प्रकारचा खेळ आहे जो सर्व वयोगटातील, सर्व सामाजिक स्तरातील लोकांना एकत्र आणतो. हा खेळ भेदभाव रहित आहे. तो धर्म, जात, लिंग किंवा आर्थिक स्थिती लक्षात न घेता सर्वांसाठी खेळला जाऊ शकतो. अनेक देशांमध्ये बुद्धिबळाचा वापर सामाजिक एकात्मता साधण्यासाठी आणि युवकांना गुन्हेगारीपासून दूर ठेवण्यासाठी केला जातो. जागतिक पातळीवर बुद्धिबळ दिन साजरा करण्याच्या पद्धतीजगभरात हा दिवस विविध प्रकारे साजरा केला जातो. अनेक देशांमध्ये राष्ट्रीय स्तरावर बुद्धिबळ स्पर्धा आयोजित केल्या जातात. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये बुद्धिबळ प्रदर्शने, व्याख्याने आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातात. डिजिटल युगात ऑनलाइन बुद्धिबळ स्पर्धांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतो.

# गणेशमूर्तींच्या दरात २० टक्क्यांची वाढ

## ●महागाईचा फटका बसूनही भक्तांमध्ये उत्साह

| रायगड | प्रतिनिधी |

अवघ्या दोन महिन्यांवर आलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण कोकणात श्री गणेशाच्या आगमनाची लगबग सुरू झाली आहे. शहरांसह ग्रामीण भागातील मूर्तीकारांच्या कार्यशाळांमध्ये सध्या गणेशमूर्ती साकारण्याचे काम वेगाने सुरू असून, दिवस-रात्र मेहनत घेत कारागीर आकर्षक आणि विविध आकारांच्या मूर्तींना अंतिम रूप देत आहेत. मात्र यंदा वाढत्या महागाईचा फटका गणेशोत्सवालाही बसला असून, कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमतीमुळे गणेशमूर्तींच्या दरात सरासरी २० टक्क्यांची वाढ झाली आहे.



शाडू माती, प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी), फायबर, रंग, वार्निश, लाकूड तसेच सजावटीच्या साहित्याच्या किमतीत गेल्या काही महिन्यांत मोठी वाढ झाली आहे. त्यातच वाहतूक, वीज आणि मजुरीच्या वाढत्या खर्चामुळे उत्पादन खर्च लक्षणीय वाढला असून, त्याचा थेट परिणाम गणेशमूर्तींच्या विक्रीदरावर झाला आहे. या महागाईत देखील गणेशभक्तांचा उत्साह मात्र कायम आहे. अनेकांनी आपल्या पसंतीच्या गणेशमूर्तींचे आगाऊ आरक्षण केले असून, सार्वजनिक गणेश मंडळांसह घरगुती गणपतींसाठीही विविध पारंपरिक आणि आकर्षक संकल्पनांवर आधारित मूर्ती तयार केल्या जात आहेत.

यंदाही पर्यावरणपूरक शाडू मातीच्या गणेशमूर्तींना नागरिकांची विशेष पसंती मिळत असल्याचे मूर्तीकारांनी सांगितले. साधेपणा, पारंपरिक स्वरूप आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या मूर्तींना यंदा अधिक मागणी असल्याचे चित्र आहे. स्थानिक मूर्तीकारांच्या मते, सातत्याने वाढणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीमुळे दरवाढ अपरिहार्य ठरली असली, तरी दर्जा आणि कलात्मकतेशी कोणतीही तडजोड करण्यात आलेली नाही. ग्राहकांना दर्जेदार, आकर्षक आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्ती उपलब्ध करून देण्यावरच भर दिला जात आहे. स्थानिक मूर्तीकारांनी गणेशभक्तांना स्थानिक कारागिरांकडूनच गणेशमूर्ती खरेदी करण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे स्थानिक कला, पारंपरिक मूर्तीकला आणि हजारो कारागिरांच्या रोजगाराला बळ मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

### यंदा मूर्ती महाग होण्याची प्रमुख कारणे

- शाडू माती, पीओपी आणि फायबरच्या किमतीत वाढ
- रंग, वार्निश व सजावटीच्या साहित्याचा वाढलेला खर्च
- मजुरी आणि वाहतूक खर्चात वाढ
- वीजदर वाढल्याने उत्पादन खर्चात वाढ
- परिणामी गणेशमूर्तींच्या किमतीत सरासरी २० टक्क्यांची वाढ

> **महागाई दिवसेंदिवस वाढत आहे. मातीच्या व रंगाच्या वाढलेल्या किमतीमुळे अवघड झाले आहे. यामुळे गणेश मूर्तीची किंमत २० टक्के वाढविण्या शिवाय पर्याय नाही. दोन हजार ते पंचवीसशे किमतीची गणेश मूर्ती आता वाढीव दराने तीन हजार ते बत्तीसशे रुपये अशी असणार आहे.**
> **-प्रभाकर पवार,गणेश मूर्तीकार**

# पंढरपूरसाठी श्रीवर्धन एसटी गाड्यांची विशेष व्यवस्था

| श्रीवर्धन शहर | प्रतिनिधी |

आषाढी एकादशीसाठी पंढरपूरला लाखो भाविक जात असतात. त्यावेळी भाविकांच्या सोयीसाठी एसटी महामंडळातर्फे जाादा गाड्यांची व्यवस्था करण्यात येत असते.श्रीवर्धन



आगारातर्फेही २१ व २२ जुलै रोजी एकेक गाडी,२३ जुलै रोजी २ गाड्या व २४ जुलै रोजी १० जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. २१ व २२ च्या बसेस लगेच दुसऱ्या दिवशी श्रीवर्धनला परत येतील तर २३ व २४ जुलैच्या बसेस २५ व २६ ला श्रीवर्धनला परत येतील. तर २८ जुलै रोजी असलेल्या गुरु पौर्णिमेनिमित्त श्रीवर्धन आगारातर्फे नाणिज येथे एक बस व अक्कलकोट येथे एक बस सोडण्यात येणार आहे.

दरम्यान ताम्हिणी घाट बंद असल्यामुळे श्रीवर्धनहून सुटणाऱ्या पुणे, लातूर, बीड या गाड्या तूर्त बंद आहेत. निदान पुण्यापर्यंत जाण्याची तरी प्रवाशांची सोय व्हावी याकरिता किमान एक गाडी पाली-खोपोलीमार्गे त्वरित सुरु करण्यात यावी अशी प्रवाशांकडून मागणी होत आहे.

# विद्यार्थ्यांना वह्या, खाऊचे वाटप

| नागोठणे | प्रतिनिधी |

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला वाघिणीच्या दुधाची उपमा दिली आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन भरपूर अभ्यास करावा. आज मिळालेल्या वह्या आणि पेन हे तुमचे खरे मित्र आहेत. त्यांचा योग्य उपयोग करून ज्ञान आत्मसात करा आणि भविष्यात उच्च शिक्षण घेऊन मोठे अधिकारी बनून समाजाची सेवा करा. तेव्हाच आमच्या या उपक्रमाचे खऱ्या अर्थाने समाधान मिळेल असे उद्गार नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष लायन विलास चौलकर यांनी वांगणी हायस्कूल मधील वह्यावाटप कार्यक्रमात काढले.



नागोठणे लायन्स क्लबच्या माध्यमातून एमजेएफ लायन विजय गणात्रा यांच्या सौजन्याने सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या वांगणी हायस्कूलमधील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आयोजित या उपक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षक व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाला लायन्स क्लबचे अध्यक्ष विलास चौलकर, सखाराम ताडकर, विवेक सुभेकर, प्रकाश जैन, दौलत मोदी, विजय शहासने, सिद्धेश काळे, लहु तेलंगे, राजू जांबेकर, सुजित चौलकर तसेच विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# खांडस नांदगाव भागातील शालेय विद्यार्थ्यांना मदत

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात आदिवासी भाग असलेल्या खांडस आणि नांदगाव येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या आदिवासी मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कामगार नेते महेंद्र घरत आणि यमुना सामाजिक संस्थेचे माध्यमातून सालाबादप्रमाणे शैक्षणीक साहित्य आणि खाऊ वाटप करण्यात आले.



पनवेल तालुक्यातील शेलघर येथील यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेतर्फे कर्जतच्या विद्यार्थ्यांना दप्तर-छत्रीचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन काठेवाडी येथे करण्यात आले होते.

कर्जत येथील रायगड जिल्हा परिषदेच्या खांडस, तुंगी, आंबेरपाडा, काठेवाडी, तेथील अंगणवाडी आदी सहा शाळांतील ३५० विद्यार्थ्यांना यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत आणि शुभांगी घरत यांच्या वतीने हे शैक्षणिक साहित्य करण्यात आले.यावेळी राम म्हात्रे, वासंती म्हात्रे, गुलाब घरत, ललिता घरत, श्रीकांत घरत, मिनाक्षी घरत, शकुंतला ठाकूर, बानु भगत, यशवंत ढोंगे आणि एम. जी. ग्रुपचे सहकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना महेंद्र घरत यांनी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे माझे कर्तव्य असल्याचे स्पष्ट केले.दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधांची वानवा असते. त्यामुळे अशा शाळेत जाणाऱ्या मुलांना शैक्षणिक मदत करून त्यांचे जीवनमान उंचावणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे दफ्तर, छत्री यांसारख्या प्राथमिक सुविधा देण्याचा गेली १५ वर्षे सातत्याने प्रयत्न करीत आहे.या सामाजिक बांधिलकी मधून कर्जत तालुक्याशी आपले वेगळे नाते आहे असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी स्पष्ट केले. यावेळी कर्जतच्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांनीही भावना व्यक्त केल्या.

# कुडली येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**सुतारवाडी** : आदर्श विद्यालय, कुडली येथे शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत तसेच गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात दहावी परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. आठवीमध्ये प्रवेश घेतलेल्या नवीन विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला आर. एल. तांबे, अभय तांबे, विजय कामथेकर, मुख्याध्यापिका ज्योत्स्ना मुंडे आदी उपस्थित होते.

# एसटी स्मार्ट कार्डला महिलांचा भरभरून प्रतिसाद

| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |

राज्य शासनाच्या महिला सन्मान योजनेअंतर्गत म हाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन म हामंडळाच्या एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणीसाठी बोर्लीपंचतन येथील कुलदीप चिंतामणी वडके यांच्या मान्यताप्राप्त संगणकीकृत आरक्षण केंद्रावर महिला व ज्येष्ठ नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



सकाळपासूनच केंद्रावर लाभार्थ्यांची मोठी गर्दी होत असून, दिवसभर नोंदणीची प्रक्रिया सुरळीतपणे सुरू आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांना एसटीच्या प्रवास सवलतीचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे बोर्ली पंचक्रोशीसह श्रीवर्धन तालुक्यातील विविध गावांतील महिला व ज्येष्ठ नागरिक या केंद्रावर नोंदणीसाठी येत आहेत.

श्रीवर्धनमध्यं एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणीसाठी हे एकमेव केंद्र असल्याने दिवसभर केंद्रावर मोठी गर्दी पाहायला मिळत असून, लाभार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने नोंदणीचे काम सुरू आहे. एसटी महामंडळाच्या वतीने प्रवाशांना डिजिटल सेवा देण्याच्या उद्देशाने स्मार्ट कार्ड योजना सुरू करण्यात आली आहे.

एसटी प्रवास सवलतीचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड आवश्यक असल्याने अद्याप कार्ड न काढलेल्या पात्र महिला, ज्येष्ठ नागरिक व अमृत ज्येष्ठ नागरिकांनी लवकरात लवकर नोंदणी करून कार्ड सक्रिय करून घ्यावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून करण्यात आले आहे.

# उरण पूर्व विभागात विजेचा लपंडाव

| चिरनेर | प्रतिनिधी |

ग्रामीण भागातील वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा, वाढीव वीज बिले, स्मार्ट वीज मीटर बाबतचा प्रश्न या महावितरण कंपनीच्या ढिसाळ कारभाराचा नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे. चिरनेरच्या उरण पूर्व विभागात पाऊस पडल्यापासून विजेचा लपंडाव सुरू झाला आहे.

तासनतास वीजपुरवठा खंडित होण्याच्या नागरिकांकडून सातत्याने तक्रारी होऊन देखील महावितरण कंपनी वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत असमर्थ ठरत आहे. वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिक, व्यापारी व शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक महावितरण कंपनीच्या गलथान कारभाराला कंटाळले आहेत. पावसाचे दिवस असूनही पावसाच्या दिवसात विजेची अत्यंत गरज भासत असताना, वीज पुरवठा तासंनतास बंद राहत असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**नैसर्गिक नाले, पाणथळी जागा दूषित** | **स्थलांतरित दूर्मिळ पक्ष्यांनीही फिरवली पाठ**

# जासई -दास्तान परिसरात प्रदुषणाची समस्या गंभीर

| चिरनेर | प्रतिनिधी |

जासई -दास्तान परिसरातील वाढत्या औद्योगिकीकरणाच्या लाटेमुळे अवैध कंटेनर यार्डच्या संख्येत बेसुमार वाढ झाली आहे. या यार्डमध्ये रासायनिक कंटेनरची हाताळणी आणि केमिकल टँकरच्या साफसफाईमुळे दूषित पाणी नैसर्गिक नाले, गटारातुन मोठ्या प्रमाणावर सोडून देण्यात येत आहे.



यामुळे नैसर्गिक नाले, पाणथळी जागा दूषित झाल्याने या परिसरात येणारे स्थलांतरित दूर्मिळ पक्षी मागील तीन वर्षांपासून दिसेनासे झाले आहेत.

जासई-दास्तान परिसरातील खासगी, सिडको, वनविभाग, महसूल विभागाच्या जागांवर अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले आहे. अनेक कंटेनर यार्ड खाडीकिनारी, पाणलोट क्षेत्र, शासकीय जागा आणि नैसर्गिक नाल्यांवर भराव टाकून अवैधरित्या उभारण्यात आलेले आहेत. या कंटेनर यार्डमध्ये विषारी धोकादायक हजरडस्टचे टॅंकर आणि तर काही कंटेनर यार्डमध्ये तर घातक रसायने वायु,वाहतूक करणारे टॅंकरही मोठ्या संख्येने ठेवण्यात येत आहेत. अशा या कंटेनर याडमध्ये घातक रसायने वायु,वाहतूक करणारे टॅंकर धुतले जातात. त्यामुळे साफसफाई, धुतलेल्या वायु, रसायनांच्या टॅंकरचे विषारी धोकादायक सांडपाणी यार्डमधुन नाले, गटारातुन सोडले जाते. असे हे प्रदुषित विषारी पाणी परिसरातील नाले गटारात मि सळून जात असल्याने नाले प्रदुषित झाले आहेत.

या परिसरातील शिवस्मारक, खाडीत याआधी स्थलांतरित दूर्मिळ पक्षी मोठ्या प्रमाणावर येत असत.मात्र मागील दोन तीन वर्षांपासून नैसर्गिक नाले, पाणथळी जागा दूषित झाल्याने या परिसरात येणारे स्थलांतरित दूर्मिळ पक्षीही दिसेनासे झाले आहेत, अशी खंत येथील पक्षीप्रेमींनी व्यक्त केली आहे.

> **जासई -दास्तान परिसरातील वाढत्या प्रदूषणाची गंभीरपणे दखल घेण्यात आली आहे. प्रदुषणाची खातरजमा करण्यासाठी नाले,खाड्यातील पाण्यांचे नमुनेही तपासणीसाठी घेण्यात आले आहेत.**
> **-विक्रांत भालेराव, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० जुलै

१) श्री. दिनेशकुमार कन्हय्यालाल वर्मा अलिबाग, २०-७-१९४८

२) श्री. मोतीराम महादेव पोरे अलिबाग, २०-७-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**श्री. तुकाराम गोऱ्या लडगे नवगाव, अलिबाग**

# खाद्यान्न पाकिटांचे वाटप

**उरण** : बोकडविरा येथील प्राथमिक शाळेत गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा उपक्रम ज्येष्ठ कबड्डी खेळाडू, सामाजिक कार्यकर्ते, शेकापचे तालुका सह चिटणीस यशवंत हरिश्चंद्र ठाकुर यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या, पेन, पेन्सिल, रबर, खडू अशा सर्व आवश्यक शालेय साहित्याच्या किटसोबतच बिस्किटे, चॉकलेट व अन्य खाद्यपदार्थांची छोटी पाकिटेदेखील वितरित करण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण पसरले. यशवंत ठाकुर स्वतः दिग्गज कबड्डी खेळाडू असून, त्यांनी एमएसईबीचे राज्य व राष्ट्रीय स्तरावर कबड्डी स्पर्धांम ध्ये प्रतिनिधित्व केले आहे. ते मशे का पक्षफ्चे तालुका सचिव तसेच मश्री गजानन प्रसादिक भजन मंडळाफ्चे सक्रिय सदस्य असून, सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान सूर्यकांत लहु पाटील यांनी भूषविले.

# निवडक



## एसटी बसेससाठी मार्ग फलक वाटप

**नेरळ** : रायगड जिल्ह्यातील कर्जत-खालापूर परिसरातील प्रवाशांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मार्गाबाबत होणारा गोंधळ टाळण्यासाठी निलेश डेकोरेटस यांच्या वतीने एक स्तुत्य आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबवण्यात आला आहे. नेरळ मालेगाव येथील निलेश डेकोरेटर्सचे प्रोप्रायटर निलेश भोईर, सुभाष भोईर आणि राखी भोईर यांनी आपल्या स्वखर्चाने एसटी बसेससाठी आवश्यक असणारे विविध आकर्षक मार्ग फलक तयार करून कर्जत आगाराला सुपूर्द केले आहेत.या भागात धावणाऱ्या प्रत्येक एसटी बसला योग्य मार्ग फलक मिळावेत, जेणेकरून ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांना बस नेमकी कोणत्या मार्गाने धावणार आहे हे ओळखणे सोपे जाईल, या हेतूने हे मार्ग फलक देण्यात आले आहेत. प्रवाशांना बस नेमकी कुठे चालली आहे हे लांबूनच स्पष्ट दिसावे, या हेतूने हे फलक तयार करण्यात आले आहेत. यामध्ये रायगड जिल्ह्यातील अनेक गावांना जोडणाऱ्या प्रमुख विविध मार्गांच्या फलकांचा समावेश आहे. अनेकदा योग्य मार्ग फलक उपलब्ध नसल्याने प्रवाशांना बस गाठण्यासाठी धावपळ करावी लागते.



## काँग्रेस महिला पदाधिकारी नियुक्त्या

**चिरनेर** : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या महिला अध्यक्षा संध्या सव्वालाखे यांच्या आदेशानुसार रायगड जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या नियुक्त्या नुकत्याच करण्यात आल्या. त्यात उरण तालुका महिला अध्यक्ष म्हणून निर्मला पाटील, रायगड जिल्हा म हिला चिटणीस सोनाली पाटील, शांता म्हात्रे, तर रायगड जिल्हा महिला सरचिटणीस म्हणून सविता ठाकूर यांची निवड करण्यात आली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्र घरत, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष डॉ. मनीष पाटील, तसेच रायगड जिल्हा महिला अध्यक्षा रेखा घरत यांच्या उपस्थितीत रायगड जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या नियुक्त्या करून त्यांना पदभार सोपवण्यात आला. यावेळी जयवंत पाटील, वैभव पाटील, किरीट पाटील, संतोष म्हात्रे, मिलिंद पाटील, तुलसा पंडित, पार्वती पाटील, जयश्री पाटील आदी उपस्थित होते. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्र घरत यांनी नवनियुक्त महिला पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.



## अमली पदार्थांविरोधात जनजागृती

**उरण** : आज नशामुक्त नवी मुंबई अभियान उरण मध्ये लीड करणारे दर्शन नाईक व प्रतिक अमृते यांनी नवी मुंबई न्हावा शेवा बंदर पोर्ट विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विजय चौधरी यांची सदिच्छा भेट घेतली व उरणचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल त्यांचे स्वागत केले. एसीपी विजय चौधरी हे सलग तीन वेळा महाराष्ट्र केसरी किताबाचे मानकरी असून आपल्या शिस्तबद्ध, कर्तव्यदक्ष आणि जनहित कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय यशानंतर त्यांनी महाराष्ट्र पोलीस दलात अधिकारी म्हणूनही उल्लेखनीय सेवा बजावली आहे. या भेटीदरम्यान उरण परिसरातील अमली पदार्थांचे व्यसन, ड्रग पेडलिंग तसेच युवकांमध्ये वाढत असलेल्या व्यसनाच्या समस्येवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अमली पदार्थांच्या विक्री व वितरणाविरोधात झिरो टॉलरन्स धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी पोलीस प्रशासन व सामाजिक संस्थांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. यावेळी शाळा, महाविद्यालये तसेच विविध सामाजिक संस्थांमध्ये संयुक्तपणे अमली पदार्थविरोधी जनजागृती कार्यक्रम व मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. या उपक्रमांसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन एसीपी विजय चौधरी यांनी दिले.सामाजिक सहभाग, जनजागृती आणि पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांतून उरण परिसराला अमली पदार्थमुक्त करण्याच्या दिशेने ही भेट महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## अध्यक्षपदी नरसू पाटील बिनविरोध

**उरण** : उच्च न्यायालयाच्या व धर्मादाय आयुक्त यांचे निरीक्षक सत्यनारायण शेनॉय यांच्या निरीक्षणाखाली दिशा शिक्षण व विकास केंद्र गडहिंग्लजची त्रैवार्षिक निवडणूक उत्साहाने पार पडली. यावेळी संस्थेच्या उपस्थित सभासदांनी बंद पडलेले ई. बी. गडकरी होमि ओपॅथिक मेडिकल कॉलेज व नवीन निर्माण केलेल्या नरसू पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी यांची ज्याने खऱ्या अर्थाने सुरुवात केली व दोन्ही कॉलेजची नावे महाराष्ट्राच्या क्षितिजावर झळकवली अशा विद्यमान अध्यक्ष नरसू पाटील यांची सर्व सभासदांनी निरीक्षकांच्या निरीक्षणाखाली बिनविरोध निवड केली. यावेळी विद्यमान सचिव ब्रह्मानंद नरसू पाटील यांचीही सचिवपदी बिनविरोध फेरनिवड करण्यात आली तसेच संस्थेच्या उपाध्यक्षपदी संतु पाटील व खजिनदार पदी तरुण तडफदार शुभम पाटील यांची ही निवड बिनविरोध करण्यात आली. यावेळी जमाखर्च व पुढील अंदाजपत्रक मांडण्यात आले. याचबरोबर आपल्या हॉस्पिटल व कॉलेजच्या उन्नतीसाठी नवीन उपक्रम कसे राबवता येतील हे मांडण्यात आले.हे सर्व प्रस्ताव सर्व सभासदांनी एकमुखी मंजूर केले यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष नरसू पाटील यांनी मरीन इंजिनिअरिंग कॉलेज व बीएचएमएस कॉलेजच्या १०० इंटेक साठी तसेच पॅरामेडिकल कॉलेजच्या उभारणीसाठी संस्थेच्या सर्व सभासदांच्या सहकार्याने उभे करण्याचे सुतोवाच केले.

# वीज कंपनीच्या कारभाराविरोधात एल्गार

## • १ ऑगस्टपासून उपोषणाचा इशारा • हजारो वीज ग्राहकांचा पाठिंबा

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील वीज वितरण व्यवस्थेतील कथित अनागोंदी, वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे, नवीन स्मार्ट वीज मीटरबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष आणि वाढत्या वीजबिलांच्या प्रश्नावर आता जनआंदोलनाची ठिणगी पडली आहे. माणगाव शहरातील सामाजिक कार्यकर्ते रणधीर कनोजे यांनी दि.१ ऑगस्ट रोजी येथील महावितरण कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या निर्णयाला शहरासह तालुक्यातील अनेक वीज ग्राहकांनी पाठिंबा दर्शविल्याने या आंदोलनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




रणधीर कनोजे यांनी आरोप केला की, महावितरणने अनेक ठिकाणी ग्राहकांना पुरेशी पूर्वसूचना, समुपदेशन किंवा संमती न घेता नवीन स्मार्ट वीज मीटर बसविले आहेत. या मीटरमुळे वीजबिलांमध्ये मोठी वाढ झाल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असून, अनेक सामान्य कुटुंबांचे मासिक आर्थिक गणितच कोलमडले आहे. त्यामुळे तातडीने नवीन मीटर हटवून पूर्वीचे मीटर पुन्हा बसवावेत आणि वाढीव व वादग्रस्त वीजबिले माफ करण्यात यावीत, अशी प्रमुख मागणी त्यांनी केली आहे. याशिवाय गेल्या तीन महिन्यांपासून अनेक ग्राहकांना नियमित वीजबिले मिळत नसल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. वीजबिलांचे वितरण करणारा ठेकेदार बदलल्यानंतर बहुतांश बिले मोबाईलवर पाठविण्याची पद्धत अवलंबण्यात आली आहे. मात्र, ग्रामीण भागातील तसेच अनेक शहरी कुटुंबांकडे स्मार्टफोन नसल्याने किंवा डिजिटल सुविधांचा अभाव असल्याने त्यांना वीजबिलाची माहितीच मिळत नाही. परिणामी बिल भरण्यासाठी ग्राहकांना महावितरण कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून, अनेकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी बिल न भरल्याच्या कारणावरून वीजपुरवठा खंडित केल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून करण्यात येत आहेत. वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे आणि विद्युतदाब कमी-जास्त होण्याच्या समस्येमुळे घरगुती उपकरणे, व्यापाऱ्यांच्या यंत्रणा, उद्योगधंद्यातील मशिनरी तसेच दवाखान्यांतील महागडी वैद्यकीय उपकरणे खराब होत असल्याचा आरोपही कनोजे यांनी केला आहे. या नुकसानीची भरपाई कोण करणार, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच, प्रशासनाने वेळेत सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर दि.१ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू करण्यात येईल आणि पुढील काळात व्यापक लोकसहभागातून तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा इशाराही रणधीर कनोजे यांनी दिला आहे.

दरम्यान, या आंदोलनामुळे माणगावसह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील वीज ग्राहकांच्या विविध प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, महावितरण यावर कोणती भूमिका घेते याकडे आता सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

> “सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरिकांनी मोठे आंदोलन केल्यानंतर प्रशासनाने जुन्या मीटरबाबत सकारात्मक भूमिका घेतली होती. त्याच धर्तीवर रायगड जिल्ह्यातील ग्राहकांनाही न्याय मिळावा आणि नवीन स्मार्ट मीटर हटवून जुने मीटर बसविण्याबाबत निर्णय घ्यावा. तसेच, हे आंदोलन कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेविरोधातील नसून, सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या न्याय्य हक्कांसाठी आहे. जनतेवर अन्याय होत असेल तर शांत बसणार नाही.”
> – रणधीर कनोजे, सामाजिक कार्यकर्ते, माणगाव

### सर्वसामान्यांवर आर्थिक संकट

सामान्य नागरिक, शेतकरी, व्यापारी, लघुउद्योजक आणि रुग्णालये या सर्वांनाच या परिस्थितीचा मोठा आर्थिक फटका बसत आहे. माणगाव शहराची लोकसंख्या, वाढते नागरीकरण आणि वाढती वीज मागणी लक्षात घेता शहरासाठी स्वतंत्र विद्युत उपकेंद्र (सबस्टेशन) तातडीने उभारण्यात यावे. त्यामुळे वारंवार वीज खंडित होणे आणि कमी-जास्त दाबाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटू शकतो, असा रणधीर कनोजे यांचा दावा आहे.



## निवडक

### तळा येथे सीड बॉल रोपण उपक्रम

**तळा** : सरस्वती विद्या मंदिर वडघर मुद्रे आणि वनविभाग माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सीड बॉल रोपण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शालेय समितीचे निमंत्रित सदस्य बाबाजी रिकामे, माणगाव क्षेत्राचे वनपाल नारायण जाधव, साई क्षेत्राचे वनरक्षक संतोष पिंगळा, उत्तेकर विभागाचे वनरक्षक पवन चौधरी, माणगावचे वनसेवक गणेश शिर्के, माझी विद्यार्थी तसेच पालक उपस्थित होते. वनपाल नारायण जाधव यांनी शाळेच्या निसर्गरम्य परिसराचे कौतुक केले. या निसर्गरम्य परिसरात सिडबॉल रोपण केल्यामुळे अधिकची वृक्ष, झाडे हे वाढू लागतील आणि त्यांचा संवर्धन होईल, असा विश्वास व्यक्त केला. वनरक्षक संतोष पिंगळा यांनी आपले मनोगत मांडताना सिडबॉल उपक्रमाची माहिती, सध्याची तापमान वाढ आणि पर्यावरणामधील बदल यावर मात करणारे ठरणार आहे. याकरिता “झाडे लावूया, झाडे जगऊया”, “वृक्षवल्ली आम्हा सोयरे” हा वसा घेऊन आपण सर्वांनी या उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### पतसंस्थेतर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**माणगाव** : माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल या संस्थेतर्फे दहावी, बारावी, पदवी, पदविका व शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झालेल्या संस्थेच्या सभासद पाल्यांचा गुणगौरव सोहळा शनिवारी (दि.१८) संस्थेच्या कार्यालयात पार पडला. यावेळी संस्थेचे चेअरमन आनंद यादव तसेच संचालक दिलीप जाधव, नरेश राजपूत, उदय म्हशीलकर, संदीप खरंगटे, दिप्ती मोरे, अरुण प्रभाळे यांच्या प्रमुख उपस्थितीसह संस्थेचे हितचिंतक ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे विकास अधिकारी राजेंद्र धारिया, माजी नगरसेवक जयंत बोडेरे, ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर मसुरे, अलीभाई यतिनमणी, माजी सरपंच सुरेश टेंबे, गजानन जाधव, संतोष यादव, लक्ष्मण जगताप, पांडुरंग जाधव, अजित हुजरे, नरेश येलगे, सभासद, ठेवीदार, खातेदार, व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड, सर्व कर्मचारीवृंद, पालकवर्ग, स्वल्पबचत प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

### गणेश निकम याला दिलासा

**श्रीवर्धन** : श्रीवर्धनमध्ये मागील काही दिवसांपासून अनेक भुरटे गुन्हे घडत होते. त्याचप्रमाणे जमाव जमवून गर्दी करणे, पोलीस ठाण्यावरती जमाव घेऊन येणे, तसेच काही भुरट्या चोरीच्या घटना देखील घडल्या होत्या. या घटनांमुळे श्रीवर्धन पोलीसांकडून चार युवकांच्या तडीपरीसाठी प्रांताधिकारी श्रीवर्धन यांच्याकडे अर्ज केला होता. त्या अर्जावरती सुनावणी होऊन या चार युवकांना श्रीवर्धन मधून तडीपार करण्यात आले होते. त्यातील काही सराईत गुन्हेगार असून, रत्नागिरी जिल्ह्यासह रायगड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये त्यांच्यावरती गुन्हे दाखल आहेत. तर, गणेश रामनाथ निकम यावरती श्रीवर्धन पोलीस ठाण्यातच गुन्हे दाखल होते. त्यामुळे या आदेशाला कोकण विभागीय आयुक्त यांच्याकडे तडीपार रद्द होण्यासाठी अपिल करण्यात आले होते. परंतु, कोकण आयुक्तांनी अपिल फेटाळल्याने त्याने मुंबई उच्च न्यायालयामध्ये तडीपरीपासून दिलासा मिळण्यासाठी याचिका दाखल केली होती. या याचिकेमध्ये सुनावणी झाल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी कोकण आयुक्त यांच्या आदेशाला स्थगिती दिली आहे. त्यामुळे गणेश निकम याचा श्रीवर्धनमध्ये येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.


● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

### गणना प्रपत्र कॅम्पचे आयोजन

**आगरदांडा** : मुरूड-जंजिरा नगरपरिषदेच्यावतीने शहरातील नागरिकांना गणना प्रपत्र भरण्यासाठी नगरपरिषद शिक्षण मंडळांच्या विविध शाळेत विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पला उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, बांधकाम सभापती-यास्मिन कादिरी, बालकल्याण समिती सभापती नगमाना खानजादे, नगरसेवक नितीन आंबुर्ले, नगरसेविका अंकिता गुरव, नगरसेवक मनिष विरुकुड, बीएलओ जयेश चोडणेकर, सायली गुंजाळ, मंगल मुनेकर, पल्लवी डोगीकर, सोनाली पेयर आदिंसह नगरसेवक व नगरसेविका यांनी प्रत्यक्ष भेट देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी केली. त्यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत, प्रपत्र भरण्यादरम्यान येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना नागरिकांना तत्पर आणि अचूक सेवा देण्याच्या सूचना दिल्या.

### पोपेरेंची उपजिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**पाली/बेणसे** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दक्षिण रायगड विभागासाठी संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने फैजल पोपेरे यांची उपजिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. या नियुक्तीमुळे श्रीवर्धन, म्हसळा, तळा या दक्षिण रायगडातील तालुक्यांमध्ये मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांनी मला दिलेल्या संधी व जबाबदारीला परिपूर्ण न्याय देणार असल्याची भावना फैजल पोपेरे यांनी व्यक्त केली आहे. मनसेकडून जारी करण्यात आलेल्या नियुक्तीपत्रानुसार फैजल पोपरे यांच्याकडे दक्षिण रायगड क्षेत्रातील संघटन विस्तार, पक्षाच्या धोरणांचा प्रसार तसेच जनसामान्यांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.


● (छायाचित्र : धम्मशील सावंत)

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● अलिबागपासून जवळच असलेल्या फार्महाऊसवर राहण्यासाठी जोडप अथवा पुरुष कामगार हवा आहे. त्वरीत संपर्क साधा. संपर्क क्रमांक – ९८२२९३८४४४.

● नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल कुक, वेटर, हाऊसकिपर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल : ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



### पत्नीप्रती जिव्हाळ्याचा सन्मान

| पेण | प्रतिनिधी |

पेणचे ज्येष्ठ समाजसेवक, विधिज्ञ आणि विविध सामाजिक उपक्रमांमधून आपला वेगळा ठसा उमटविणारे अॅड. बापुसाहेब नेने यांनी पत्नीप्रती असलेला आदर, जिव्हाळा आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक अनोखा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. त्यांनी आपल्या राहत्या नेने वाड्याला पत्नी शुभांगी नेने यांच्या नावाने “शुभांगी सदन” असे नामकरण केले आहे. अॅड. नेने यांचे सामाजिक कार्य दीर्घकाळापासून सर्वश्रुत आहे. समाजोपयोगी कार्य करताना त्यांनी नेहमीच कुटुंबीयांच्या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्याच भावनेतून त्यांनी आपल्या आयुष्यभराच्या सहचारिणीच्या नावाने घराला ओळख देत पत्नीप्रती असलेला सन्मान कृतीतून व्यक्त केला आहे.

### ‘आयुष्यमान भारत’ला प्रतिसाद

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिका आरोग्य विभागाच्यावतीने खांदा कॉलनी येथील सेक्टर १३ मधील देवी आंबा माता मंदिर परिसरात आयुष्मान भारत नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने लाभ घेतला. या शिबिरात पात्र नागरिकांची आयुष्मान भारत योजनेसाठी नोंदणी करून आरोग्य कार्ड तयार करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात आली. तसेच, योजनेची माहिती आणि शासनाकडून मिळणाऱ्या आरोग्य सुविधांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

## श्रुतिका, नमिताचे नेत्रदीपक यश

| पोलादपूर | प्रतिनिधी |

पोलादपूर येथील डॉ. घनश्याम शेठ यांच्या दोन्ही मुली श्रुतिका आणि नमिता यांचे लंडनमध्ये उच्च शिक्षण पूर्ण झाले असून, त्यांनी तेथे नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे. नमिताने प्राथमिक शिक्षण जनसेवा प्रतिष्ठानच्या प्रशालेसह कन्या शाळा पोलादपूर येथे, तर रयत शिक्षण संस्थेच्या विद्यामंदिरामध्ये माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. उच्च माध्यमिक शिक्षण पुणे येथील सर परशुराम भाऊ महाविद्यालयात केल्यानंतर मराठवाडा विद्यापीठाच्या विधी महाविद्यालयासह इंडियन लॉ सोसायटी लॉ कॉलेजमध्ये कायदे विषयक पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. याचदरम्यान, तिची लहान बहीण श्रुतिका ही देखील जनसेवा आणि कन्या शाळा पोलादपूर येथे प्राथमिक शिक्षण व रयत शिक्षण संस्थेच्या विद्यामंदिरामध्ये माध्यमिक शिक्षण पूर्ण करून उच्च माध्यमिक शिक्षण पुणे येथील सर परशुराम भाऊ महाविद्यालयात दाखल झाली.



इंडियन लॉ सोसायटी लॉ कॉलेजमध्ये कायदे विषयक पदवीसोबतच श्रुतिकाने कंपनी सेक्रेटरीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर या दोघींनी उच्च शिक्षणासाठी लंडन येथे जाण्याचा निर्णय घेतला आणि तेथील ब्रुनेल कॉलेज ऑक्स ब्रीचमध्ये प्रवेश घेतला. या कॉलेजमध्ये श्रुतिकाने एमएससी इन फायनान्स एंड अकाउंटन्सी मध्ये सुवर्ण पदक प्राप्त करीत प्रथम श्रेणीमध्ये कंपनी सेक्रेटरीची पदवी प्राप्त केली. तर, नमिताने इंटरनॅशनल फायनान्शियल रेग्युलेशन्स अँड कॉर्पोरेशन लॉ विषयातील एलएलएम हे कायद्याचे उच्च शिक्षण प्राप्त केले.

## मोफत छत्री वाटपाचा शुभारंभ

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

पावसाळ्यात सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्याच्या उद्देशाने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने सुधागड तालुक्यात मोफत छत्री वाटपाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचे अनावरण ज्येष्ठ शिवसेना नेते व माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या उपक्रमामागे नाडसूर गावचे ज्येष्ठ व निष्ठावंत शिवसैनिक किशोर पवार यांची संकल्पना असून, शिवसेनाप्रमुखांच्या “८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण” या विचारधारेचा वारसा जपत त्यांनी हा लोकहिताचा उपक्रम हाती घेतला आहे. सामाजिक बांधिलकी जपणारे किशोर पवार यांनी शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक आणि समाजसेवा क्षेत्रात सातत्याने योगदान देत ग्रामीण भागातील अनेक उपक्रमांना हातभार लावला आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना छत्रीची गरज लक्षात घेऊन तालुक्यातील गोरगरीब व गरजू नागरिकांपर्यंत मोफत छत्र्या पोहोचविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या माध्यमातून अनेक कुटुंबांना प्रत्यक्ष मदत मिळत असून सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून शिवसेना पक्षाने उचललेले हे पाऊल नागरिकांसाठी दिलासादायक ठरत आहे.


● (छायाचित्र : धम्मशील सावंत)

### मुलींमध्ये श्रावणी देशात अव्वल

| चिरनेर | प्रतिनिधी |

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षण घेतलेली श्रावणी कुदळे ही नीट परीक्षेत मुलींमध्ये देशात पहिली आली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीए तर्फे वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट परीक्षेत पुणे जिल्ह्यातील खडकी या छोट्याशा खेडेगावातील श्रावणी कुदळे हिने ७२० पैकी ७१० गुण मिळवून चमकदार कामगिरी दाखविली आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेऊनही मोठे यश संपादन करता येते हे श्रावणीने दाखवून दिले आहे.

## स्वरा मसुरे गुणवत्ता यादीत झळकली

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष प्रभाकर मसुरे यांची कन्या स्वरा मसुरे हिने भारत टॅलेंट सर्च परीक्षेत राज्याच्या गुणवत्ता यादीमध्ये २५७वा क्रमांक पटकावत उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिचे माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. श्रेयश कुलकर्णी व राजिप शाळा विकास कॉलनी शाळेच्या मुख्याध्यापिका पूर्वा येलवे यांनी खास कौतुक करीत अभिनंदन केले. स्वरा हिने अनेक महापुरुषांच्या जीवनावर भाषणे दिली असून, आपल्या वडीलांच्या वक्तृत्व शैलीचा आदर्श नजरेसमोर ठेऊन विविध वक्तृत्व स्पर्धांतून विविध व्यासपीठे गाजवीत आहे. चौथीच्या वर्गात असताना बीटीएस परीक्षेत अथक परिश्रम, जिद्द घेऊन स्वराने भरपूर अभ्यास करून हे यश संपादन करून माणगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



## ‘तांत्रिक शिक्षणाची कास धरावी’

| उरण | प्रतिनिधी |

आधुनिक युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग असून, विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत तांत्रिक शिक्षणाची कास धरणे ही काळाची गरज आहे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा प्रभावी वापर करण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य सुविद्य गावंड यांनी केले. नुकतेच अकरावीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही शाखेतील शिक्षण घेत असताना आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा अभ्यास करून त्यांचा सकारात्मक वापर करण्यासाठी विशेष मेहनत घ्यावी. त्यामुळे भविष्यातील स्पर्धात्मक जगात यश मिळविणे अधिक सुलभ होईल, असे त्यांनी सांगितले.




## मनोज गावंड डॉक्टरेटने सन्मानित

| खरोशी | प्रतिनिधी |



पेण येथील महाराष्ट्र सामाजिक विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मनोज गावंड यांच्या ३० वर्षांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानीत करण्यात आले. साउथ वेस्टर्न अमेरिकन युनिव्हर्सिटी देशभरात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्यकरणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन विद्यापीठातर्फे त्यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करून सन्मानित करते. मनोज गावंड यांनी १९९८ मध्ये महाराष्ट्र सामाजिक विकास संस्था स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा, पाणलोट विकास, एचआव्ही निर्मूलन, ग्राम समृद्धी ग्रामीण विकास, मानवी हक्क रक्षण यासह अनेक प्रकल्प राबविले. तसेच, महिलांचे हक्क, एड्स जनजागृती या सारखे उपक्रमे राबवले आहेत. मानवी हक्क या विषयातील भरीव योगदानाची दखल घेऊन साउथ वेस्टर्न अमेरिकन युनिव्हर्सिटीने त्यांना मानद डॉक्टरेट पदवी चेन्नई येथे आयोजित विशेष समारंभात ग्लोबल एज्युकेशन मिशनचे डॉ. आर. सेल्वम यांच्या अध्यक्षतेखाली, तामिळनाडू क्रीडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. ए.एम. मूर्ती यांच्या हस्ते यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित केले.

## नुकसान भरून काढण्यासाठी प्रभावी योजना | शेतकऱ्यांना विमा उतरविण्याचे आवाहन

# पिकाला आर्थिक सुरक्षा कवच

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात खरीप हंगामात भाताची शेती तसेच नाचणी आणि वरीची शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. परंतु, वातावरणातील बदल आणि लहरी हवामानामुळे खरीप हंगामातील शेती संकटात आली आहे. त्यामुळे “जुलै अखेरपर्यंत आपल्या पिकाचे विमा उतरावा”, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी राजाराम शिंदे व कृषी अधिकारी दिनेश कुमार कोळी यांनी केले आहे.

यंदाच्या खरीप हंगामासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत कर्जत तालुक्यातील भात व नाचणी पिकांसाठी शेतकऱ्यांची नोंदणी सुरू झाली आहे. दि.३१ जुलै ही अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे. नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, पूर, भूस्खलन, दुष्काळ, वादळ, कीड व रोगांमुळे पिकांचे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी ही योजना प्रभावी आर्थिक सुरक्षा कवच ठरणार आहे. शासनाच्या निर्णयानुसार अधिसूचित महसूल मंडळामध्ये संबंधित पिकाचे चालू हंगामातील सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनापेक्षा कमी झाल्यास पात्र शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी इफ्को टोकीयो जनरल इन्शुरन्स कंपनी मार्फत करण्यात येत आहे. त्यामुळे या पीक विमा योजनेत सहभागी होऊन आपल्या पिकाला आर्थिक सुरक्षा कवच प्रदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




### शेतकरी हप्ता अन् विमा संरक्षण

**भात :**
शेतकरी हप्ता– ६५० रुपये प्रति हेक्टर
संरक्षित रक्कम– ६५ हजार रुपये प्रति हेक्टर

**नाचणी :**
शेतकरी हप्ता– ४०० रुपये प्रति हेक्टर
संरक्षित रक्कम– ४० हजार रुपये प्रति हेक्टर

### अर्ज कुठे करावा?

शेतकरी बँक, कॉमन सर्व्हिस सेंटर किंवा केंद्र शासनाच्या अधिकृत पीक विमा पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज करू शकतात. तसेच, अर्ज करण्यासाठी ७/१२ व ८-अ उतारा, अॅग्रीस्टॅक फार्मर आयडी, आधार कार्ड, पीक लागवड घोषणापत्र, आधारशी संलग्न बँक खाते आणि भाडेतत्त्वावरील जमीन असल्यास नोंदणीकृत भाडेकरार या कागदपत्रांची आवश्यकता आहे.

# मनसेचे डान्स बारविरोधी आंदोलन तात्पुरते स्थगित

## परिमंडळ ३ च्या पोलिसांना सात दिवसांची मुदत

**। पनवेल । प्रतिनिधी।**

रायगड जिल्ह्यातील डान्स बारविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने छेडलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिमंडळ३ पोलीस उपायुक्त कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत पोलिसांनी परिमंडळ३ कार्यक्षेत्रातील सर्व डान्स बारवर येत्या सात दिवसांत ठोस, प्रभावी आणि कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर मनसेने महानगर अध्यक्ष योगेश चिले यांचे १९ जुलै रोजीचे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या जवळ, पनवेल येथे होणारे बेमुदत उपोषण आंदोलन तात्पुरते सात दिवसांसाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

बैठकीला परिमंडळ३च्या पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त (एसीपी) तसेच परिमंडळातील सर्व पोलीस स्थानकांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे पनवेल महानगर अध्यक्ष योगेश चिले,रायगड जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, जिल्हा सचिव अतुल चव्हाण, महानगर महिला अध्यक्षा स्वरूपा सुर्वे,महानगर सचिव पराग बालाड,महानगर सचिव उल्हास कदम यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.



बैठकीदरम्यान पोलीस प्रशासनाने डान्स बारविरोधातील कारवायांचा वेग वाढविण्यात येईल आणि सात दिवसांच्या आत प्रभावी कारवाई केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन दिले. तसेच राज्य शासनाकडून डान्स बार संदर्भात लवकरच नवीन कायदा लागू होणार असून, त्यानंतर अशा आस्थापनांवर अधिक कठोर कारवाई करणे शक्य होईल, अशी माहिती पोलीस उपायुक्तांनी दिली. नवीन कायदा लागू होईपर्यंत पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

पोलीस प्रशासनाच्या आश्वासनाचा आदर राखून मनसेने आंदोलन तात्पुरते स्थगित केले असले, तरी सात दिवसांत अपेक्षित स्वरूपाची ठोस कारवाई न झाल्यास अधिक तीव्र स्वरूपाचे लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसेने दिला आहे.

रायगड जिल्ह्यातील सामाजिक वातावरण बिघडविणाऱ्या डान्स बार संस्कृतीविरोधातील लढा पुढेही सुरू राहील आणि समाजहितासाठी आवश्यक त्या सर्व लोकशाही मार्गांचा अवलंब करण्यात येईल, असा निर्धार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

## मध्यम स्वरूपाची इंडस्ट्री टिकली पाहिजेः अध्यक्ष पी.पी.बारदशकर



**। रोहा । प्रतिनिधी ।**

सद्याच्या परिस्थितीत इतर राज्यात विशेषतः गुजरात राज्यात उद्योग व्यवसाय जात आहेत.मात्र सर्व सोयसुविधा असताना आपल्या राज्यात उद्योग व्यवसायाला अधोगती लागली आहे.या विषयी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. असे असताना आपल्या भागात रोहा एमआयडीसी स्वच्छता व सुरक्षतेच्या बाबतीत अग्रेसर आहे. अर्थकरणामुळे रोह्याचा विकास झाला ही गोष्ट कोणीही नाकारु शकत नाही.म्हणून मध्यम स्वरूपाची इंडस्ट्री राज्यात, कोकणात टिकली पाहिजे असे स्पष्ट मत रोहा इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष पी.पी.बारदशकर यांनी व्यक्त केले.

आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, काम करताना थोड्या बहुत चुका होत असतात. इंडस्ट्रीच्या उणिवा काढल्या पाहिजे आणि त्या उणिवा दूर देखील झाल्या पाहिजे पण उणिवा काढताना त्या गोष्टीचा विपर्यास होता काम नये. दैनंदिन व्यवहार सुरू राहिल्याने कंपनीला नफा मिळते.कंपनी बंद ठेवणे मालकांना परवडणारी गोष्ट नाही.कारण बँकांकडून कर्ज घेतल्याशिवाय कंपनी मालक आपला व्यवसाय सुरू शकत नाही.अर्थातच वेळेवर बँकचे हफ्ते देखील भरले पाहिजे.आज आव्हाने खूप आहेत. देशाअंतर्गत परिस्थिती खूप भयंकर आहे.यासाठी सर्वांकडे सहकार्य करणे गरजेचे असल्याचे सांगत व्यवसाय टिकला पाहिजे त्यासाठी प्रोग्रेस अवशवक असल्याचा मत बारदशकर यांनी व्यक्त केले.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - **मुख्य संपादक**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत ही या मिळकतीचे विद्यमान मालक १. लक्ष्मण तातूराम नाईक, २. अविनाश एकनाथ नाईक, ३. उर्मिला एकनाथ नाईक, ४. महेश एकनाथ नाईक, ५. वनिता नरदास पाटील, ६ जनार्दन तातूराम नाईक, ७. रघुनाथ तातुराम नाईक, ८. लक्ष्मीबाई तातूराम नाईक,९. विलास तातूराम नाईक, सर्व रा. परहुर, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केली आहेत. या मिळकतीबाबत मालकीहक्काचा शोध घेण्याचे काम मजकडे सोपवण्यात आले आहे.

**-: मिळकतींचे वर्णन :-**

| मौजे | ग.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|---|
| परहुर ता.अलिबाग | १७७ | -- | ०-२१-८०<br>०-०१-००<br>०-२२-८० | ६.२५ |

सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीमधील आपला मालकी हक्क अबाधित आहे, तसेच सदर मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा १. लक्ष्मण तातूराम नाईक, २. अविनाश एकनाथ नाईक,३. उर्मिला एकनाथ नाईक, ४. महेश एकनाथ नाईक, ५ वनिता नरदास पाटील, ६ जनार्दन तातूराम नाईक, ७ रघुनाथ तातुराम नाईक, ८. लक्ष्मीबाई तातूराम नाईक, ९. विलास तातूराम नाईक, यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आणुन द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकती बाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर मागाहुन येणारी कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहुन आलेली अशी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक. १९/०७/२०२६

Cjayant Law Office
**ॲड. जयंत हरेश्वर चेऊलकर**
२०१, सृष्टी, २ रा मजला, वेधशाळेसमोर,
अलिबाग, रायगड.

# गो. म. वेदक विद्यामंदिरात रक्तदान शिबीर संपन्न



**। तळा । प्रतिनिधी ।**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य आणि स्वर्गीय बाळशेठ देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त गो. म. वेदक विद्यामंदिर, तळा येथे नुकतेच एका भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला रक्तदात्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा येथील राष्ट्रीय सेवा योजना, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गो. म. वेदक विद्यामंदिर, डॉ.प्र.म जोशी प्रशाला पन्हेळी, प्राथमिक विद्यामंदिर या सर्व विभागाच्या वतीने हे रक्तदान शिबीर यशस्वी पार पडले. सदर शिबीर यशस्वी पार पडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता कुंटेवाड, प्राध्यापक भरत चाळके, महादेव लोकरे, मितेश मुळे, प्रा. पाटील, सुहास वावेकर आणि एनएसएसच्या स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.याप्रसंगी तळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे, मंगेश देशमुख, पुरुषोत्तम मुळे, महेंद्र कजबजे, चंद्रकांत रोडे, श्रीराम कजबजे, बी.के.पटेल, लिलाधर खातू आदी मान्यवर उपस्थित होते.

# बळीराजाच्या कष्टाला मानाचा मुजरा!

## ‘शेताच्या बांधावर सन्मान’ उपक्रमातून दोन प्रगतशील शेतकऱ्यांचा गौरव

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

देशाचा अन्नदाता असलेल्या बळीराजाचा सन्मान हा केवळ सभागृहातील व्यासपीठावर नव्हे, तर त्याच्या शेताच्या बांधावर जाऊन व्हावा, या उदात्त भावनेतून रायगड प्रेस क्लब संलग्न खालापूर प्रेस क्लबचा शेताच्या बांधावर सन्मान हा उपक्रम गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने राबविला जात आहे. यंदाही शेतीत नवे प्रयोग, सेंद्रिय शेतीचा अवलंब आणि पूरक व्यवसायातून आर्थिक स्वावलंबनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या दोन प्रगतशील शेतकऱ्यांचा त्यांच्या शेतात जाऊन सन्मान करण्यात आला.

खोपोली येथील विश्वास उर्फ बाळा भिवा गायकवाड आणि वावोशी (शिंदेवाडी) येथील संध्या मोरे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सेंद्रिय शेतीसोबत कुक्कुटपालन, पशुपालन, वृक्षसंवर्धन आणि सेंद्रिय खत निर्मिती अशा पूरक व्यवसायात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

स्वर्गीय संतोष पवार यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे शिफारशीवर नव्हे, तर प्रत्यक्ष शेताला भेट देऊन, शेतीतील कामकाजाची पाहणी करून गुणवंत शेतकऱ्यांची निवड केली जाते. त्यामुळे हा सन्मान अधिक विश्वासार्ह आणि बळीराजाच्या कष्टाचा खरा गौरव करणारा ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाला रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, खालापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष भाई ओव्हाळ, जिल्हा परिषद सदस्य तथा गटनेते संतोष बैलमारे, कृषी विभागाचे अधिकारी, पत्रकार, लोकप्रतिनिधी आणि शेतकरी उपस्थित होते.

यावेळी संतोष बैलमारे म्हणाले, रासायनिक शेतीच्या वाढत्या दुष्परिणामांच्या पार्श्वभूमीवर सेंद्रिय शेती ही काळाची गरज बनली आहे. शेतीसोबत फळबाग, कुक्कुटपालन, पशुपालन, गोपालन आणि इतर पूरक व्यवसायांचा स्वीकार केल्यास शेतकरी आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होऊ शकतो. खालापूर प्रेस क्लबचा हा उपक्रम शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवणारा आणि शेतीकडे समाजाचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणारा आहे.

शेती हा केवळ उदरनिर्वाहाचा व्यवसाय नसून भारतीय संस्कृतीचा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या श्रमाचा त्यांच्या बांधावर जाऊन सन्मान करणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, नव्या पिढीला शेतीकडे अभिमानाने आणि सकारात्मक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा देत आहे.

# सहआयुक्तांकडून शाळेचे कौतुक

**तळा :** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तळे येथे शिक्षण विभागाच्या सह आयुक्त (तपासणी), कोकण भवन डॉ. मनीषा देवगुणे यांनी तपासणी भेट देऊन शाळेच्या शैक्षणिक, प्रशासकीय व भौतिक प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला.तपासणीदरम्यान डॉ. देवगुणे यांनी शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची अध्ययन प्रगती, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, स्पर्धा परीक्षांमधील उल्लेखनीय यश तसेच मागील सात ते आठ वर्षांपासून नवोदय, शिष्यवृत्ती, गणित सबोध डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा यांचा सातत्याने वाढत गेलेला निकाल याबद्दल समाधान व्यक्त केले. वाढती विद्यार्थी संख्या, लोकसहभागातून उभारण्यात आलेल्या शाळेच्या भौतिक सुविधा, स्वच्छ व आकर्षक परिसर आणि विद्यार्थी केंद्री उपक्रम यांचेही त्यांनी विशेष कौतुक केले.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुनाडे, ता. उरण, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १३०/१८६ | एकूण क्षेत्र ०-६२-०० हे.आर | ८.३१ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-२०/०७/२०२६
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड
पिन नं.४०२१०७

# कांबे शाळेत मतदान प्रात्यक्षिक

**रसायनी :** रायगड जिल्हा परिषद शाळा कांबे येथे सर्व विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष निवडणूक कशी असते याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. मतदान केंद्र तयार करून शालेय मंत्रिमंडळ निवड प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया घेऊन करण्यात आली. मतदान सुरू झाल्यानंतर झोनल अधिकारी तेलंगे, कोंडिलकर यांनी भेट दिली. या अटीतटीच्या निवडणुकीत विद्यार्थी कैवल्य विनोद कुरंगळे यांना सर्वाधिक मते मिळाली व मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. तसेच दिव्या दिनेश राजभर हिची उपमुख्यमंत्री म्हणून निवड झाली. तसेच आरोग्य मंत्री, सहल मंत्री, परिपाठ मंत्री, बागकाम मंत्री, सांस्कृतिक मंत्री अशा पदांसाठी आवाजी मतदानाने निवड करण्यात आली.विद्यार्थ्यांना काही वेळापुरते मंत्रीपद मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून आले.

# संदीप शिंगटे यांची उंबरने गावाला भेट



**। रसायनी । राकेश खराडे ।**

तालुक्यातील चौक दूर क्षेत्र प्रभारी संदीप शिंगटे यांनी दुर्गम भागातील आदिवासी वाडी उंबरने येथे दोन तासांपेक्षा जास्त पायी चालत उंबरने वाडीला भेट देऊन तेथील वस्तुस्थिती जाणून घेतली.

उंबरने वाडीतील एका गर्भवतीला बाळंतपणासाठी चादरीची डोली करून खांद्यावरून सात किमीचा खडतर प्रवास करून चौक येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, ही बाब सोशल मीडियावर व्हायरल झाली होती, आणि पुन्हा लोकांना १९ जुलैच्या इरसाल वाडीच्या दुर्घटनेची आठवण आली. ही परिस्थिती समजल्यावर कोणतीही संबंधित शासकीय यंत्रणा अथवा एखादा अधिकारी, कर्मचारी तेथे पोहचला नाही. मात्र चौक प्रभारी म्हणून नव्याने नियुक्त झालेले संदीप शिंगटे यांनी त्याचवेळी सायंकाळी तेथे जाण्याचा निर्णय घेतला आणि पोह.मनोहर पाटील, कुर्बान तडवी आणि पोलीस पाटील झोरे यांच्यासह अंधार होण्याअगोदर तेथे पोहचले. या वाडीत दारूबंदी आहे, हे विशेष. शिक्षणाची आवड असलेले विद्यार्थी येथे आहेत. महिला आणि पुरुष मेहनती असून शेती, दुग्ध व्यवसाय, भाजीपाला करतात, तिथूनच दोन तास डोंगर दरीतून वाट काढत, लोखंडी शिडीवरून ते माथेरान येथे जाऊन मजुरी करतात, गावठी भाजी, गावठी अंडी, कोंबड्या विकून आपला उदरनिर्वाह करतात याची माहिती सपोनि. संदीप शिंगटे यांना मिळाली. येथील प्रत्यक कुटुंबाशी त्यांनी संवाद साधला, योग्य मार्गदर्शन केले आणि पुन्हा अंधाऱ्या रात्री चौक दूर क्षेत्र येथे आले. खरे पाहता झालेल्या घटनेशी पोलिसांचा काहीएक संबंध नाही, पण आपल्या कार्यक्षेत्रातील गाव पाहून तेथील वस्तुस्थिती जाणून घेतली, हे विशेष. फक्त निवडणूक काळात पोलीस येतात, आमचे गावात दारू बनत नाही, कुणीही दारू पित नाही, तरीही पोलीस विचारपूस करून घेण्यासाठी आले, आम्हाला समाधान वाटले, असे ग्रामस्थानी सांगितले.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. अब्दुल वहाब शाह व इतर यांनी खालील वर्णनाच्या जमीन मिळकती त्या मिळकतींचे मालक श्रीमती. सुरेखा भरत पाटील यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजेः माले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्रफळ हे आर-पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३९/७ | ०-३७-००<br>पो.ख ०-०३-०० | ०-३१ |
| ३९/८ | ०-८७-००<br>पो.ख ०-०५-०० | ०-८१ |

सदरील मिळकतीत किंवा मिळकतींच्या एखाद्या भागात कोणत्याही व्यक्ति/कंपनी/संस्था इ. चा विरुद्ध कब्जाने किंवा त्या भागात वारसा, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, देणगी, लीज, इजमेंट, अखत्यारपत्र, विकसन करार किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमच्या अशिलांच्या व्यवहारास हरकत असल्यास, अशा व्यक्ति/कंपनी/संस्था इ. यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत पुराव्यासह लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतींशी कोणत्याही व्यक्ति कंपनी/संस्था इ. चा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील सदरहु व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार/हरकत विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २०/०७/२०२६
**ॲड. काशीफ इरफान नजे**
०३, अमान कॉम्प्लेक्स, खांडा रोड, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मो. ७५५८२३३३२३

**जाहिर नोटिस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक इरशाद अहमेद बब्बन खान यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे-चिंचवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर. | आकारणी रु.-पै |
|---|---|---|---|
| २६ | ८/ब | ०.१५.०० पो.ख.०.०१.००<br>एकुण क्षेत्र ०.१६.००<br>मिळकतीचे खरेदीखत | ०.२० |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक २०/०७/२०२६
**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम. एल. एल. बी.
पत्ताः दहिवली, ए.व्ही.एफ.रेसिडेन्सी,
ललानी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

# १७ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आशेचा नवा किरण!

**। माणगाव । सलीम शेख ।**

यंदा तरी गणपती बाप्पांचे आगमन खड्डेमुक्त रस्त्याने होईल का? हा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रत्येक कोकणवासीयाच्या मनात घर करून बसला होता. असंख्य आश्वासने, वारंवार बदललेल्या मुदती, अपूर्ण कामे आणि हजारो नागरिकांच्या संयमाची कठोर परीक्षा घेतलेल्या माणगावइंदापूर बायपासला अखेर पुन्हा एकदा आशेची नवी पालवी फुटली आहे.

- **मंत्री आदिती तटकरे यांची माणगाव इंदापूर बायपासला प्रत्यक्ष भेट**
- **गणेशोत्सवापूर्वी एक मार्गिका सुरू करण्याचे आश्वासन**

राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी माणगाव इंदापूर बायपास महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी येत्या गणेशोत्सवापूर्वी किमान एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली करण्यात येईल, असे ठाम आश्वासन दिले. पाहणीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी संबंधित यंत्रणांना कामात कोणतीही दिरंगाई होऊ नये, अशा स्पष्ट सूचना दिल्याचे सांगितले.



यावेळी मंत्री तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेबाबतही स्पष्ट भूमिका मांडली. ही योजना कोणत्याही परिस्थितीत सुरूच राहणार असून पात्र महिलांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही, अशी त्यांनी ग्वाही दिली. ज्या महिलांनी वेळेत केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांना लाभ निश्चित मिळेल. विरोधकांनी केलेल्या टीका आणि न्यायालयीन प्रक्रियेनंतरही शासनाने आवश्यक सुधारणा करून योजना अधिक सक्षमपणे सुरू ठेवली असल्याचे त्यांनी सांगितले.

रायगडच्या विकासाविषयी बोलताना त्या म्हणाल्या की, जिल्ह्याला दोन मंत्री आणि खासदार सुनील तटकरे यांचे नेतृत्व लाभले आहे. या सर्वांच्या समन्वयातून विकासकामांना अधिक गती देण्याचा प्रयत्न सुरू असून राजकीय मतभेदांपेक्षा जनतेच्या हिताला प्राधान्य दिले जात आहे. पालकमंत्री कोणताही असो, त्याला माझ्या शुभेच्छाच असतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, आनंद यादव, स्थानिक नागरिक ,अधिकारी उपस्थित होते.

**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्याकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात विद्यमान मालक आणि आमचे अशिल यांच्यात कोणताही लेखी करारनामा केलेला नाही.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**


| मौजे | भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| थळ ता.अलिबाग | १२९/३ | ०-२०-६०<br>पो.ख ०-०३-३०<br>एकुण क्षेत्र ०-२३-९० | ३.०६ |
| थळ ता.अलिबाग | १२९/४ | ०-१०-२०<br>पो.ख ०-०६-५०<br>एकुण क्षेत्र ०-१६-७० | १.६२ |
| थळ ता.अलिबाग | १२९/५ | ०-०४-००<br>पो.ख ०-०१-००<br>एकुण क्षेत्र ०-०५-०० | ०.७७ |

वर नमुद सर्व मिळकती या नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग,
दिनांक- २०/०७/२०२६
सही/-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय - रायगड, ता. अलिबाग,
जि. रायगड मोबाईल नं ९७६४२१४०१०

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# ‘नगराध्यक्ष चषक’ जलतरण स्पर्धेला उत्साहात प्रारंभ

## अलिबागमध्ये जलतरणपटूंच्या कौशल्याला मिळाले व्यासपीठ

## मुख्याधिकारी सागर साळुंखे यांच्या हस्ते उद्घाटन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग येथील स्व. नमिता नाईक क्रीडा संकुल येथे रविवार (दि. १९ जुलै) रोजी ‘नगराध्यक्ष चषक’ जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेला उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. ॲक्वाटिक असोसिएशन ऑफ रायगड आणि स्व. नमिता नाईक क्रीडा संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन अलिबाग नगर परिषदेचे मुख्याधिकारी सागर साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले.




### रायगडभरातील स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग

उद्घाटन समारंभाला वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक, सभापती अनिल चोपडा, माजी नगरसेवक प्रदीप नाईक, मुख्याधिकारी सागर साळुंखे, पोलीस अधिकारी किशोर साळे, नगरसेविका अश्विनी ठोसर, नगरसेवक ॲड.ऋषिकेश माळी, नगरसेविका निवेदिता वाघमारे, नगरसेविका योजना पाटील, नगरसेवक जमाल सय्यद, नगरसेवक समीर ठाकूर, नगरसेवक संदीप पालकर माजी नगरसेवक महेश शिंदे यांच्यासह अन्य पदाधिकारी, अधिकारी, मान्यवर, स्पर्धक, पालक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री गणेशाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर स्व. नमिता नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले आणि जलतरण स्पर्धेचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.

उद्घाटनानंतर विविध वयोगटांतील जलतरणपटूंनी फ्रीस्टाइल, बॅकस्ट्रोक, ब्रेस्टस्ट्रोक आणि बटरफ्लाय या प्रकारांतील स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला.यावेळी बोलताना वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक म्हणाले, ग्रामीण आणि शहरी भागातील गुणवंत जलतरणपटूंना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील स्पर्धात्मक वृत्ती वाढविणे आणि रायगडमधून राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडविणे हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे. अलिबागमध्ये आधुनिक क्रीडा सुविधा उभारल्या असून भविष्यातही जलतरणासह विविध क्रीडा प्रकारांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील. अशा स्पर्धांमधून खेळाडूंचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना मोठ्या स्पर्धांसाठी तयारी करण्याची संधी मिळते. माजी नगरसेवक प्रदीप नाईक यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत आयोजकांचे अभिनंदन केले. जिंकणे किंवा हरणे हे प्रत्येक स्पर्धेचा भाग असते. मात्र, क्रीडाभावना जपत सर्वोत्तम खेळ करण्याचा प्रयत्न करणे हेच खरे यश आहे. अशा दर्जेदार स्पर्धांमुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळते आणि पुरस्कारांबरोबरच आत्मविश्वासाचीही मोठी कमाई होते, असे सांगत त्यांनी सर्व स्पर्धकांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.





रायगड जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या शेकडो जलतरणपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला असून दिवसभर विविध गटांतील स्पर्धा रंगल्या.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रथम तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. अलिबागमध्ये जलतरण संस्कृतीला चालना देणारी आणि नवोदित खेळाडूंना नवे व्यासपीठ उपलब्ध करून देणारी ही स्पर्धा जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरत असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## निवडक

### नव्या कोचनं हाती घेतली धुरा

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट चाहते सध्या इंग्लंडविरुद्धच्या रोमांचक एकदिवसीय मालिकेवर लक्ष केंद्रित करत आहेत आणि येत्या काही दिवसांत सुरू होणाऱ्या झिम्बाब्वे दौऱ्याबद्दलही ते तितकेच उत्सुक आहेत. क्रिकेटचे व्यस्त वेळापत्रक खेळाडू आणि प्रशिक्षक या दोघांचीही कसोटी घेते आणि या पार्श्वभूमीवर, बीसीसीआयने एक अतिशय सुज्ञ निर्णय घेतला आहे. ऐतिहासिक लॉर्ड्सवर १९ जुलै रोजी होणाऱ्या अंतिम एकदिवसीय सामन्यानंतर लगेचच, भारतीय संघ २३ जुलैपासून झिम्बाब्वेविरुद्ध टी-२० सामना खेळेल. हे अत्यंत व्यस्त वेळापत्रक आणि सपोर्ट स्टाफच्या कामाचा ताण सांभाळण्यासाठी, बीसीसीआयने एक अनोखी रणनीती अवलंबली आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर वरिष्ठ एकदिवसीय संघासोबत इंग्लंडमध्ये असले तरी, भारतीय संघाची एक नवीन, तरुण तुकडी एका नवीन आणि अत्यंत अनुभवी मुख्य प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली झिम्बाब्वेला रवाना झाली आहे. इंग्लंडमध्ये एकदिवसीय मालिका खेळणारे आणि झिम्बाब्वेविरुद्धच्या टी-२० संघातही असेलेले खेळाडू, लॉर्ड्सवरील एकदिवसीय सामन्यानंतर थेट लंडनहून झिम्बाब्वेला संघात सामील होतील. उर्वरित युवा खेळाडू व्हीव्हीएस लक्ष्मण यांच्या देखरेखीखाली आधीच भारतातून रवाना झाले आहे. या युवा टी-२० संघात आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडण्यास उत्सुक असलेले नवीन चेहरे आहेत आणि व्हीव्हीएस लक्ष्मण यांचे मार्गदर्शन या संघासाठी महत्त्वाचे ठरेल.

### आशियाई बॉक्सिंग भारतीय अंतिम फेरीत

**नवी दिल्ली :** आशियाई बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये भारतीय बॉक्सरची प्रभावी कामगिरी सुरूच आहे. सोमवारी झालेल्या १९ वर्षांखालील उपांत्य फेरीत नऊ भारतीय बॉक्सर अंतिम फेरीत पोहोचले, तर सहा जणांनी कांस्यपदके पटकावली. १९ वर्षांखालील महिलांच्या गटात, सर्व आठ भारतीय बॉक्सरनी उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम फेरीत प्रवेश केला. चाहत हिने चायनीज तैपेईच्या पेई-चुन त्साईचा ५-० ने पराभव केला.अंशिका हिने पहिल्या फेरीत रेफरीने सामना थांबवल्यामुळे चायनीज तैपेईच्या आन-ची त्सेंगचा पराभव केला. मेघा श्योकंद हिची व्हिएतनामी प्रतिस्पर्धी सामना पुढे खेळू शकली नाही, त्यामुळे तिला थेट अंतिम फेरीत प्रवेश मिळाला. प्राची तोकास हिने पहिल्या फेरीत रेफरीने सामना थांबवल्यामुळे चायनीज तैपेईच्या शू-झियान वांगचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. यापूर्वी विजेतेपद पटकावलेल्या भारतीय बॉक्सरसह, आता १९ वर्षांखालील महिलांच्या गटातील सर्व आठ भारतीय बॉक्सर अंतिम फेरीत पोहोचले आहेत. पुरुष गटात, दोन भारतीय बॉक्सर अंतिम फेरीत पोहोचले आहेत. आदित्यने दुसऱ्या फेरीत दक्षिण कोरियाच्या ह्योनमिन लीचा आरएससीने पराभव केला. शुभम राजपूतने किर्गिझस्तानच्या ऐतबेक बर्डीमुराटोव्हचा ३-२ अशा अटीतटीच्या लढतीत पराभव केला.

### नीरूला ट्रॅप प्रकारात सुवर्णपदक

**लोनाटो :** इटलीतील लोनाटो येथे झालेल्या आयएसएसएफ शॉटगन विश्वचषक २०२६ मध्ये महिलांच्या ट्रॅप प्रकारात नीरू धांडाने सुवर्णवेध साधला. आयएसएसएफ विश्वचषकातील हे नीरू धांडाचे पहिले वैयक्तिक पदक आणि तिच्या कारकिर्दीतील एकूण दुसरे पदक होते. या वर्षाच्या सुरुवातीला, नीरूने विवान कुमारसोबत जोडी करून अल्माटी येथे झालेल्या स्पर्धेत मिश्र ट्रॅप प्रकारात कांस्यपदक जिंकले होते. विशेष म्हणजे, इटलीतील नीरूच्या विजयापूर्वी, यावर्षी शॉटगन प्रकारात भारताचे हे एकमेव आयएसएसएफ विश्वचषक पदक होते. पात्रता फेरीत १२५ पैकी १२१ गुण मिळवून अंतिम फेरीत पोहोचल्यानंतर, नीरूने आठ महिलांच्या अंतिम फेरीतही आपला चांगला फॉर्म कायम ठेवला. भारतीय नेमबाजाने सहजपणे पहिल्या तीनमध्ये स्थान मिळवले आणि पोडियमवर आपले नाव कोरले, परंतु सुवर्णपदक जिंकण्यासाठी तिला फ्रान्सच्या माजी विश्वविजेत्या आणि ऑलिम्पियन कॅरोल कॉर्मेनियरकडून कडवी झुंज मिळाली.अंतिम फेरीतील शेवटचे दोन शॉट्स शिल्लक असताना, नीरू आणि कॉर्मेनियर प्रत्येकी २५ गुणांवर बरोबरीत होत्या. त्या फ्रेंच खेळाडूचा नेम चुकला, पण नीरूने आपला संयम राखला आणि ही अटीतटीची स्पर्धा जिंकली. इटलीच्या माजी ज्युनियर विश्वविजेत्या एरिका सेसाला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले, तर पॅरिस २०२४ ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती सिल्व्हाना स्टँकोसाठी पदक फेरी निराशाजनक ठरली आणि अंतिम फेरीतून बाहेर पडणारी ती पहिली खेळाडू ठरली. भारताची मनीषा कीर पात्रता फेरीत १०व्या स्थानावर राहिली. यापूर्वी, पुरुषांच्या ट्रॅप प्रकारात भारतीय नेमबाजांची कामगिरी निराशाजनक ठरली, ज्यात त्यांच्यापैकी कोणीही अंतिम फेरीत पोहोचू शकले नाही. आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदक विजेता कायनान चेनाई ७१व्या स्थानी राहिला, तर केवळ मानांकन गुणांसाठी खेळणाऱ्या पृथ्वीराज तोंडाईमानने ३२व्या स्थानासह पात्रता फेरीत सर्वोत्तम भारतीय कामगिरी केली.



## राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा

# चानू, लवलीना भारताच्या ध्वजवाहक

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

ऑलिम्पिक पदक विजेत्या मीराबाई चानू आणि लव्हलिना बोरगोहेन ग्लासगो येथे होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात भारताच्या ध्वजवाहक असतील. भारतीय ऑलिम्पिक संघाने शनिवारी याची घोषणा केली. या बहु-क्रीडा स्पर्धेचा उद्घाटन समारंभ २३ जुलै रोजी आयोजित केला जाईल.आयओए अध्यक्ष पीटी उषा म्हणाल्या की, दोन्ही खेळाडूंना हा सन्मान मिळणे अभिमानास्पद आहे. सध्या दोन्ही खेळाडू युनायटेड किंगडममध्ये प्रशिक्षण घेत आहेत.




मीराबाई चानू ८ ऑगस्ट रोजी ३२ वर्षांच्या होतील. त्या सुमारे एक दशकापासून भारताच्या प्रमुख वेटलिफ्टर आहेत. त्यांनी २०२१ च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये रौप्यपदक आणि २०२२ च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. जरी त्या २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकू शकल्या नाहीत, तरी ग्लासगोमध्ये त्या भारताची मोठी आशा आहेत.

लव्हलिना बोरगोहेनने टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकले होते. त्यानंतर तिने २०२३ च्या जागतिक चॅम्पियनशिपमध्ये सुवर्ण आणि २०२३ च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्य पदक पटकावले. ग्लासगोमध्ये होणाऱ्या या स्पर्धांमध्ये लव्हलिनाला भारताच्या प्रमुख पदक दावेदारांपैकी एक मानले जात आहे.

# पीव्ही सिंधू जपान ओपनमध्ये पहिल्यांदाच चॅम्पियन

। टोकिया । वृत्तसंस्था।

भारताची स्टार बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधूने जपान ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धा जिंकली आहे. तिने पहिल्यांदाच ही स्पर्धा जिंकली आहे. ३१ वर्षीय सिंधूने दीर्घकाळानंतर कोणतेही मोठे विजेतेपद पटकावले आहे. तिने अंतिम सामन्यात जपानच्या अकाने याम ागुचीला हरवले.



सिंधूने शेवटचे २०२२ मध्ये सिंगापूर ओपन सुपर ५०० चे विजेतेपद जिंकले होते. त्यानंतर २०२४ च्या सय्यद मोदी इंटरनॅशनलनंतर हा तिचा पहिला अंतिम सामना होता. यादरम्यान ती मलेशिया ओपन सुपर ५०० मध्ये उपविजेती देखील राहिली होती.

सेमीफायनलमध्ये चीनच्या चेन यू फेई हॅमस्ट्रिंग दुखापतीमुळे रिटायर्ड हर्ट झाल्या. त्यावेळी सिंधू आघाडीवर होती. यासोबतच सिंधूने फायनलमध्ये स्थान मिळवले.क्वार्टर फायनलमध्ये जपानची माजी वर्ल्ड चॅम्पियन नोजोमी ओकुहारा दुखापतीमुळे खेळू शकली नाही, त्यामुळे सिंधूला वॉकोव्हर मिळाला.

# कुस्तीत अमन सेहरावतला सुवर्णपदक

। बुडापेस्ट। प्रतिनिधी ।

हंगेरीतील बुडापेस्ट येथे पॉलिक इमरे, वर्गा जानोस आणि कोझ्मा इस्तवान मेमोरियल २०२६ कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी भारताच्या अमन सेहरावतने पुरुषांच्या ५७ किलो फ्रीस्टाइल प्रकारात सुवर्णपदक जिंकले. बुडापेस्ट रँकिंग सिरीजच्या उद्घाटनप्रसंगी दीपक आणि विशाल कलिरामाना यांनी कांस्यपदके जिंकून भारताच्या पदकतालिकेत तीन पदकांची भर घातली.



एप्रिलमध्ये आशियाई कुस्ती चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक जिंकल्यानंतर अमन सेहरावतने आपल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेतला. पॅरिस २०२४ मध्ये पदक जिंकून तो भारताचा सर्वात तरुण ऑलिम्पिक पदक विजेता ठरला. हे पदक जिंकण्यासाठी त्याने उल्लेखनीय कामगिरी केली. या २२ वर्षीय भारतीय कुस्तीपटूने जॉर्जियाच्या निकोलोज बोचोरिशविलीवर तांत्रिक श्रेष्ठतेने विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली. त्यानंतर त्याने उपांत्यपूर्व फेरीत कझाकस्तानच्या ऑलिम्पियन मेरामबेक कार्टबेचा पराभव केला. उपांत्य फेरीत, अमनने अझरबैजानच्या विद्यमान युरोपियन चॅम्पियन इस्लाम बझारगानोव्हचा पराभव केला आणि अंतिम फेरीत, त्याने जॉर्जियाच्या रॉबर्ट डिंगाश्विलीचा तांत्रिक श्रेष्ठतेने पराभव केला. त्याचे चारपैकी तीन विजय तांत्रिक श्रेष्ठतेने मिळाले. दरम्यान, दीपकने पुरुषांच्या ६१ किलो फ्रीस्टाइल प्रकारात कांस्यपदक जिंकण्यासाठी उल्लेखनीय पुनरागमन केले. कांस्यपदकाच्या सामन्यात अझरबैजानच्या नुराद्दीन नोवरुझोव्हविरुद्ध पिछाडीवर असूनही, दीपकने जबरदस्त पुनरागमन केले आणि रोमांचक विजय मिळवला. यापूर्वी, या भारतीय कुस्तीपटूने उपांत्यपूर्व फेरीत जॉर्जियाच्या रमीझ तुरमानिद्झेचा पराभव केला, परंतु उपांत्य फेरीत कझाकस्तानच्या असिल ऐताकिनकडून पराभूत झाला. विशाल कलिरमनाने ६५ किलो वजनी गटात कझाकस्तानच्या उसुमझान दास्तानबेकला हरवून कांस्यपदक पटकावले. निकषांनुसार उपांत्य फेरीत तो इराणच्या अहमद इब्राहिमझादेहकडून पराभूत झाला.

# भारताच्या चिमुकल्या फुटबॉलपटूंनी रचला इतिहास!

## सलग दुसऱ्या वर्षी गोथिया कप जिंकला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताच्या मिनर्व्हा अकादमीने प्रतिष्ठित गोथिया कप २०२६ जिंकून आंतरराष्ट्रीय युवा फुटबॉलच्या शिखरावर पोहोचली आहे. स्वीडनमधील गोटेबर्ग येथे १३ ते १९ जुलै २०२६ दरम्यान झालेल्या गोथिया कपच्या रोमांचक अंतिम सामन्यात, मिनर्व्हा अकादमीने ब्राझीलच्या दिग्गज आर.एस. स्पोर्ट्स संघाला २-१ ने पराभूत केले.




या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय युवा फुटबॉल स्पर्धेत ११ वर्षांखालील ते १९ वर्षांखालील वयोगटातील १,७०० हून अधिक संघ आणि ४०,००० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. या ऐतिहासिक विजयाने, युरोपियन भूमीवर प्रत्येक वेळी पाऊल ठेवल्यावर अजिंक्य चॅम्पियन म्हणून परतण्याचा भारतीय क्लबचा अविश्वसनीय विक्रम निश्चित केला.नुकताच फिनलंडमध्ये हेलसिंकी कप जिंकल्यानंतर, या युवांनी स्वीडनमध्येही आपले खंडीय वर्चस्व कायम ठेवले आणि जगातील सर्वोत्तम युवा अकादमींविरुद्ध पूर्णपणे अपराजित राहिले. हा महासंग्राम १८ जुलै रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३:४५ वाजता खचाखच भरलेल्या स्टेडियममध्ये सुरू झाला.

# नीरजचा राष्ट्रकुल खेळांसाठी स्वित्झर्लंडमध्ये सराव

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

यंदाच्या राष्ट्रकुल खेळांच्या पार्श्वभूमीवर, भारताचा स्टार भालाफेकपटू आणि दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता, नीरज चोप्रा, स्वित्झर्लंडमधील बिएन येथील आपल्या प्रशिक्षण तळावर कठोर प्रशिक्षण घेत आहे.



तो इतर कोणत्याही स्पर्धेत भाग घेण्याऐवजी थेट ग्लासगोला जाण्याची शक्यता आहे, जिथे २३ जुलैपासून राष्ट्रकुल खेळ सुरू होत आहेत.

नीरज चोप्राने २०१८ च्या गोल्ड कोस्ट राष्ट्रकुल खेळांमध्ये सुवर्णपदक जिंकले होते, पण दुखापतीमुळे तो २०२२ च्या बर्मिंगहॅम खेळांना मुकला होता. यावेळी, तो आपल्या कारकिर्दीतील दुसऱ्या राष्ट्रकुल खेळांमध्ये स्पर्धा करणार आहे.

या वर्षी जूनमध्ये झालेल्या दोहा डायमंड लीगमध्ये, नीरजने ८५.६९ मीटरच्या सर्वोत्तम भालाफेकीसह चौथे स्थान पटकावले होते. आता, त्याचे लक्ष ग्लासगो राष्ट्रकुल खेळांमधील सुवर्णपदकावर आहे.

पुरुषांच्या भालाफेकीची पात्रता फेरी ३० जुलै रोजी, तर अंतिम फेरी ३१ जुलै रोजी होणार आहे. भारतीय थलेटिक्स महासंघाने नीरजला राष्ट्रकुल खेळांपूर्वी कोणत्याही स्पर्धेत भाग घ्यायचा की नाही, हे ठरवण्याचे स्वातंत्र्य दिले होते.

# लोणावळा मॅरेथॉनमध्ये रत्नागिरीला यश

**रत्नागिरी :** लोणावळा वर्षा मॅरेथॉनमध्ये रत्नागिरीतील महिला धावपटू मानसी मराठे यांनी द्वितीय, वाटद खंडाळा येथील धावपटू अजित किंजळे याने द्वितीय आणि गुहागरमधील अनंत तानकर यांनी दहा किमीमध्ये द्वितीय क्रमांक पटकावून जिल्ह्याचे नाव उंचावले. रत्नागिरीतील ३० जण लोणावळा वर्षा मॅरेथॉनमध्ये, १० जण कुडाळ मान्सून मॅरेथॉनमध्ये व ५० जणांनी सायकलवारीमध्ये सहभाग घेऊन फिटनेस चळवळीला गती दिली.

## कोलकातामध्ये परीक्षा पुढे ढकलली | बंगळुरूमध्ये हॉटेल उशिरापर्यंत उघडे राहणार

# फुटबॉल वर्ल्डकप फायनलची क्रेझ

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

जगातील सर्वात मोठ्या क्रीडा स्पर्धेतील फुटबॉल विश्वचषकाचा अंतिम सामना आज रात्री १२:३० वाजता खेळला जाईल. यात अर्जेंटिना आणि स्पेनचे संघ वर्ल्ड चॅम्पियनच्या किताबसाठी आमनेसामने असतील. लिओनेल मेस्सीच्या संघाला सलग दुसरे विजेतेपद जिंकायचे आहे, तर लामिल यमालच्या संघाला दुसऱ्या विजेतेपदाची प्रतीक्षा आहे.अंतिम सामन्याची क्रेझ भारततही दिसून येत आहे.

सर्वाधिक वेड कोलकातामध्ये आहे. येथे स्पोर्ट्स बार, मल्टिप्लेक्स, क्लब आणि वस्त्यांमधील मैदानांवर मोठ्या स्क्रीन लावण्यात आल्या आहेत. हे वेड इतके आहे की शाळांनी २०-२१ जुलैच्या परीक्षा



पुढे ढकलल्या आहेत. बंगळुरू पोलीस आणि आसाम सरकारने हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि क्लबना सकाळी ३:३० वाजेपर्यंत खुले ठेवण्याची परवानगी दिली आहे.

मोहन बागान क्लबचे सदस्य प्रसेनजीत सरकार यांनी सांगितले, बंगालमध्ये कोणी म्हटले की त्याला फुटबॉल आवडत नाही, तर त्याच्या बंगाली असण्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. कोलकातामध्ये अर्जेंटिनाचे समर्थक सर्वाधिक आहेत. अर्जेंटिना जिंकला तर जल्लोष तसाच होईल, जसा भारताने क्रिकेट विश्वचषक जिंकल्यावर होतो.

तिरुवनंतपुरममधील कॅटरर पी. सुरेंद्रन यांना २५ लिटर पालाडा पायसम (दूध-तांदळाची गोड डिश) ची ऑर्डर मिळाली आहे. सुरेंद्रन यांनी ३ दिवसांपूर्वीच अर्जेंटिनाच्या विजयाच्या सेलिब्रेशनची घोषणा केली आहे.

केरळमधील मंदिरांमध्ये, विशेषतः गुरुवायूरच्या श्रीकृष्ण मंदिरात, मेस्सी आणि स्पेनच्या यमालसाठी चाहते खास प्रार्थना आणि नैवेद्य अर्पण करण्यासाठी गर्दी करत आहेत.

गुवाहाटीमधील पंचतारांकित हॉटेल्समध्ये वर्ल्डकप थीमवर आधारित डिशेस गुवाहाटीमधील उच्चभ्रू क्लब्स आणि पंचतारांकित हॉटेल्सच्या वर्ल्ड कप थीममध्ये मेस्सी किक बर्गर आणि स्पॅनिश ट्रॉफी मॉकटेल यांसारख्या डिशेसचा समावेश आहे. अनेक प्रसिद्ध पब्स आणि लाउंजने जर्सी ड्रेस कोड अनिवार्य केला आहे. रेस्टॉरंटच्या फरशीवर कृत्रिम गवत (टर्फ) अंथरले आहे. कर्मचारीही हातात शिट्टी आणि जर्सी घालून सर्व्ह करत आहेत.

कोच्चीच्या ईगल एफसी फुटबॉल क्लबने मोठ्या स्क्रीनवर थेट प्रक्षेपणासाठी तिकिटाची किंमत ९० ते ५०० रुपये ठेवली आहे. अंतिम सामन्याची बुकिंग पूर्ण झाली आहे. विजयानंतर चाहत्यांमध्ये भांडणे होऊ नयेत, यासाठी मोठा पोलीस बंदोबस्तही तैनात राहणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)